# फाईव्ह स्टार न्यूज

वर्ष 11 वे | **मे 2024** | अंक 125 वा

MAKH

















रजि. नं. महा/23991/कोल्हापूर, एफ्/21258/कोल्हापूर

MAKH
स्था.: 04-08-2007

## मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक)

प्लॉट नं. पी-4, ए एम्-28, मॅक चौक, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल-हातकणंगले, जि. कोल्हापूर-416 236.
ऑफिस फोन: (0231) 2305373. मोबा.: 8530445373, 9561445374
E-mail : presidentmakh@gmail.com | Website : **www.makhkolhapur.org**

## We Supply



### Plumbing Material
uPVC & PVC, HDEP, Large Dia GI & MS & SS, cPVC Pipes & Fitting etc.



### Safety Item
Safety Belts, Jackets, Shoes, Goggles, Ear Plugs/ Mufflers, Masks, various type of gloves, Safety Nets etc.

### Standard Star Couplings / Spider Couplings
Love Jov Coupling, Star Coupling



Rod, Cable, Holder, Gas Cutter Hose, Welding Hand screen, Cylinder key, Pressure Regulator, Welding Torch & accessories, CO2 Mig Welding Wire, CO2 Contact Tip, Tip Holder, Diffuser, CO2 Liner, Conical Nozzle





### Fasteners
Regular/ Hardened (TVS Unbrako) Nut Bolts, Anchor Fasteners, Foundation Bolts Allen Bolts, Roofing Bolts/ Screws, Al Rivets.



### Industrial Lubricants
Hydraulic Oil, Cutting Oil, Break Oil, Food Grade Oil and various types of Grease etc.



# KOLHAPUR TRADING PVT. LTD.

Single Source Destination For Your Multiple Requirements

Gat No. 356/2 K Five Star MIDC Road, Kagal, Kolhapur 416216
Head Office : 0231-2620315, 2625394 Fax 0231-2620019
Shop : 9921942552, 9921925885



### Packing Material
Strap Hand Tensioner & sealer, Plastic Sutli, Packing Clips, BOPP Tape, Water Gummed Tape, Stretch Film, Packing Patti (Pet/PP), & Bubble Sheet etc..



### Pneumatic Fitting
Air Blow Guns, PU Pneumatic Pipe And Its Fittings , Pneumatic Control Valves.

### Paints
Industrial (Emulsion, PU, Epoxy, Water Thinnable) Asian, Berger, British make, Putty, Spray Gun , Paint Tray, Paint Scrapper, POP, Spray Paint Canisters.



### Electric Item
Wires, Cables, Switches, Halogen fitting & Tubes, Aluminium Lugs, Shock Proof Hand gloves, GI Cable Tray, Spark Free Light Fittings etc.





### Cleaning Items
Naphthalene Balls, Liquid Soap, Floor Cleaner, Dust Bin, Dust Control Mop, Floor Wiper, Hard Broom, Broom Pipe, Washing Brush, Supli.

### Hand Tools
The complete hand tool shop with a quality range of tools.
Make :- Tapena & Jhalani



And Further... Samruddhi Unbreakable Plastic Utensils, Roofing Sheet, Electric Hand Tools, Construction Chemical Accessories, Cement , Adhesive Items , Abrasive Item, Stationery Items, Industrial Lubricants

E-mail Id :- ktpl.kagal@ksmgroup.co.in



॥ श्री जोर्तिर्लिंग प्रसन्न ॥
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
www.adhiengineering.in
Mr. Amol D. Khambe
8087341176
9595525363
Box Type Single Girder Eot Crane
www.adhiengineering.in
www.adhiengineering.in
Double Girder Overhead Cranes
JIB Crane
Scissor Lift Table
Single Girder E.O.T. Crane
Wire Rope Hoist
Modular Wire Rope Hoist
DSL Busbar System
Air Compressor PPR FR Blue Pipeline & Fittings
Reciprocating Air Compressor
Screw Air Compressor
Refrigerated Air Dryer
Chain Hoist
Manual Stacker
Semi Electric Stacker
Fully Electric Stacker
Electric Paper Reel Stacker
Manual Drum Tilter & Lifter
Hydraulic Beam Shifting Trolley
Pallet Truck
Dock Levellers
Single Mast Goods Lift
All Types of Elevator
Aluminium Air Pipe Line
Weight Crane Scale
Webbing Sling
Radio Remote
Push Button Pendant
Filter Element & Filter
LLDPE TUBE
Zero Air Loss Drain Valves
Tec44 Auto Drain Valves
Auto Drain Valves
Compressed Air Fittings
Magnetic Lifter
Mini Electric Hoist
Helical Gear Motor
Hydraulic Puller
Engine Crane
Construction Mini Crane
Geared Trolley
Chain Pulley Block
Electric Winch
Pneumatic-Grease Pump
Hydraulic Service Lift
Vehicle Washer
High-Bay Lights
Street Lights
LED Flood Lights
LED Tube Light
Racking System
Mr. Amol D. Khambe
9595525363
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
8087341176
Kiran Bungalow, M. G. Patil Chowk, Patil Galli, Unchgaon, Kolhapur-416005. Maharashtra.
email : adhiengineering8485@gmail.com, info.adhiengineering@gmail.com
Website : www.adhiengineering.in
GST No. 27ABEFA3201G1Z1

# PRECISE PEB PVT. LTD.

- Plot No. D 112/3, Kagal-Hat. five star MIDC, Kolhapur, Maharashtra-416216
- Mob. 9921063063 / 7083729009
- Email : info@precisepeb.com
- Website : www.precisepeb.com
- CIN - U45309PN2019PTC184729

**PRECISE PEB** is a full service metal building construction company with the aim to provide quality steel buildings while delivering prompt personalized and professional service. If you can imagine a project, we can build the steel structure to fit your needs. From Farm Buildings to Retail Buildings, Warehouses, Garages / Workshops and specialized applications, **PRECISE PEB** has the expertise and experience to complete your project on time and on budget with civil & building.

## WE PROVIDE - END TO END


- Concept & Architectural Solution in PEB
- Site development / Design Build services (Civil works)
- Supply & installation of steel building and related work.
- Overall responsibility and interface lionising.
- Work shop facility Pullthrow & Palzma cutting machine

## PEB ADVANTAGE

- Larger span
- Faster construction & Completion
- Cost efficiency
- Economical
- Control Quality
- Strength & Stability














Sanjay D. Pendse 9422044216 | Subodh S. Pendse 9922960961

KP SINCE 1988

# KAYPEE MACHINES PVT. LTD.

A-249, Five Star MIDC, Kagal,
Kolhapur - 416 236

**9922960955, 0231-2305129**

kaypeemachineskop@gmail.com

**Manufacturers of-**
- Engineering & Auto Component Precision Machining.
- Patterns & Dies, Jigs, Fixtures, SPM's.
- Spares for Various Machines & Equipments.
- Power Chucks Reconditioning.
- Machine Maintenance Services.

Near Suresh Machinery,
Shivaji Udyamnagar, Kolhapur-416 008.

**9922960956, 9922960950**

sales.kaypeemachines@gmail.com

**Dealers in -**
- Machines & Equipments.
- Material Handling Equipments.
- Laser Cutting Machines.
- Plasma Cutting Machines.
- Inspection Equipments.
- Machine Tool Accessories.

DMW

# DYNAMIC METAL WORKS

**Manufacturer's of**

1. ALUMINUM CASTING, HEAT TREATMENT & SHOT BLASTING
2. S G IRON & CI CASTINGS

**HARISHCHANDRA S. DHOTRE**

**President :**

Manufacturers Assocation Kagal, Hatkangale, Kolhapur.
Yog Viday Dham, kolahpur.
Akhil Gurav Samaj Sanghtna, Kolahpur Dist.



**HARSHWARDHAN H. DHOTRE**

Mob.8600151546

Factory : Plot No. B-41, Five Star MIDC, Kagal,
Dist. Kolhapur-416 236.
Ph. No. 0231-2305173
Mobile : 9422412903
Email : dynamicmetal1@hotmail.com
Website : www.dynamicmetalworks.in


DARSHAN
COLOUR COATED SHEETS

# DARSHAN ENTERPRISE


Mfg. PPGI Colour Coated Sheets



## Roofing Sheets



## Linear Sheets




Bending Sheets




Doom Bending



Self Tapping Screw



Corner Flash



Redges

Light Blue

Off White

Brick Red

Mist Green

Reliance Green

D-42, Behind Mantri Metallics,5 Star MIDC, Hupari Road, Kagal, Tal. Hatkanangale, Kolhapur - 416236

**Contact - 9922627774**

Industrial Automation

PLC Based Electrical Panels

MCC and Distribution Panles

Industrial Furnace Panels

APFC Panels

Electrical Switchgears

Lighting and Time bell Panels



Shree
|| Sadgurukrupa||
Automation
ISO 9001-2015

Industrial Automation & Electrial panels manufacturing company

Address : G-66, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. Mob. 8308949500
Email : suresh.sadgurukrupaautomation@gmail.com

SHREE
SAMARTH KRUPA
E MART

आता कोल्हापूरला जायची गरज नाही

इलेक्ट्रीकल

इलेक्टॉनिक्स्

ॲटोमेशन प्रॉडक्ट

सर्व ई प्रॉडक्टस् आपल्या कागल पंचतारांकित एमआयडीसीत.

Plot No. P4, Makh Association Building,
Makh Chowk, **Kagal - Hatkanangale MIDC.**
**8308949500, 9373762980**

CONNECT US FOR YOUR
POWERFUL
BUSINESS





FUSION AQUA
FUSION AQUA
MANUFACTURER OF HDPE, PVC &
HYDROPHONICS PIPES & FITTINGS
ISO 9001-2015
Certified Mfg.Company
MJP Approved
IS:4984/3016
CM/L 7500589947
Plot No. A-233, Kagal-Hatakangale Road,
Five Star MIDC, Kagal, Kolhapur-416 236.
+91 9960376869, +91 9960399494,
+91 9960392424, Off.:+91 9309977494
contact@fusionaqua.in
www.fusionaqua.in
MORE
STRENTH
HIGHEST
DURABILITY
HDPE
PIPES
MDPE
PIPES
FITTINGS
HDPE PIPES OF DIAMETER
20MM TO 200MM
MANTRA : 9822518735, 7385304534



## संपादकीय

फाईव्ह स्टार न्यूज
मे २०२४

# मान्सूनची आनंदवार्ता

प्रचंड वाढलेल्या तापमानामुळे आणि उष्म्यामुळे त्रस्त झालेला अवघा देश आकाशाकडे डोळे लावून मान्सूनची वाट पहात आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा जास्त म्हणजे 106 टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. अंदमान मध्ये मान्सून वेळेवर दाखल झाला असून 31 मे रोजी केरळात दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. महाराष्ट्रात तळ कोकणात साधारणपणे 7 जून रोजी मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे.

मान्सूनविषयीच्या वार्ता सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांना सुखावणाऱ्या आहेत. विशेषतः फेब्रुवारी महिन्यांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागलेल्या दुष्काळग्रस्त भागासाठी मान्सूनचे आगमन अधिक दिलासादायक ठरणारे आहे. भारत आजही कृषिप्रधान देश असल्याने मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मान्सूनची साथ लाभल्याखेरीज देशांच्या आर्थिक विकासाची चाके गतिमानतेने फिरत नाहीत. ज्येष्ठ जलतज्ज्ञ दत्ता देशकर याबाबत सांगतात की, आज बदलत्या हवामानामुळे पावसाचे दिवस कमी होत आहेत. पूर्वी जवळपास 70 ते 80 दिवस पाऊस पडत होता, आता पावसाचे दिवस घसरत-घसरत 30 पर्यंत खाली आले आहेत, म्हणजेच 30 दिवसात पडणारा पाऊस आपल्याला 365 दिवस सांभाळून ठेवायचा आहे. तरच आपल्याला वर्षभर पाणी मिळू शकेल. हे करण्यासाठी आपल्याला पाणी साठवण भांडयाचा आकार वाढवावयास हवा. ही भांडी जमिनीवर नाहीत तर भूगर्भात वाढवावी लागणार आहेत. सध्या आपण पडणाऱ्या पावसापैकी फक्त 10 ते 12 टक्केच पाणी अडवितो. जलतज्ज्ञ म्हणतात की हा आकडा वाढून 31 टक्क्यापर्यंत आणणे आवश्यक आहे. तरच आपली पाण्याची गरज पूर्ण होवू शकेल.

वाढत्या उष्णतेला काटशह देण्यासाठी आपल्याला वनस्पतींमध्ये वाढ करण्याची गरज आहे. तिथे आपण खूपच कमी पडतो आहोत. वृक्षराजी संवर्धन ही बाब आपल्या मनाने स्विकारली आहे. पण प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. वृक्ष हे जलपुनःर्भरणासाठी मदत करतात. वाहून जाणारे पाणी झुडपांपाशी अडते. झुडपांमुळे जनावरांना चारा मिळतो. वृक्षराजी पर्जन्यमानाला स्थिर करतात. हवेला अडथळा निर्माण करुन बाष्पीभवनाचा दर कमी करतात. या गोष्टींकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत.

पाणी हा शाश्वत विकासाचा पाया आहे. शेती आणि उद्योगव्यवस्था ही याच पायावर उभी आहे. पाण्याशिवाय शेती होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे उद्योगांनाही पाण्याची गरज असते. इतकेच नव्हे तर शेती आणि उद्योगांना लागणाऱ्या विजेच्या निर्मितीसाठीही पाणी आवश्यक असते. त्यामुळे शेती आणि उद्योगांचा शाश्वत विकास व्हावा यासाठी पाण्याचा सुयोग्य आणि काटकसरीने वापर आवश्यक आहे. हा विचार केवळ पावसाळ्याच्या पूर्वसंध्येला अनुसरुन व चर्चा करुन चालणार नाही, तर कायमस्वरुपी हे जीवनसूत्र बनले पाहिजे.

संस्थापक संपादक : **श्री. अशोक दुधाणे**
सहसंपादक : **श्री. संजय पेंडसे**
अध्यक्ष : **श्री. हरिश्चंद्र धोत्रे**
उपाध्यक्ष : **श्री. मोहन कुशिरे**
सचिव : **श्री. विठ्ठल पाटील**
खजानिस : **श्री. सुरेश क्षीरसागर**

**फाईव्ह स्टार न्यूज मासिक जाहिरात दरपत्रक**

| जाहिरातीचे प्रकार | मासिक दर | वार्षिक दर |
|---|---|---|
| पूर्ण पान-रंगीत (कव्हर पेज मागील) | - | २५,०००/- |
| पूर्ण पान-रंगीत (आतील पान) | - | २०,०००/- |
| अर्धे पान-रंगीत (आतील पान) | - | १०,०००/- |
| पूर्ण पान (कृष्णधवल) | ₹ १,४००/- | ₹ १६,०००/- |
| अर्धे पान (कृष्णधवल) | ₹ ८००/- | ₹ ९,५००/- |

**जाहिरातीसाठी संपर्क : 8530445373, 9561445374**

मुद्रक : मॅक पंचतारांकीत एम्. आय.डी.सी. यांनी 'फाईव्ह स्टार न्यूज' या नावाने 'मंत्र', राजारामपुरी १३ वी गल्ली, कोल्हापूर येथे छापून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, फाईव्ह स्टार एम्. आय.डी.सी., कागल-हातकणंगले येथून प्रकाशित केले.

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| क्षणचित्रे | 2 |
| आयात-निर्यातीबाबत हवा सजगपणा | 8 |
| महिला उद्योजकांची वाढती व्याप्ती | 11 |
| बचतीची गंगा आक्रसतेय... | 14 |
| दिलासादायक सलामी; पण... | 17 |
| हरित अर्थव्यवस्थेची दुसरी बाजू | 20 |
| परदेशस्थांचा आर्थिक आधार | 22 |

# मा. विशेष पोलीस महानिरीक्षक व मा. जिल्हापोलीस प्रमुख कोल्हापूर यांच्या समवेत औद्योगिक संघटनांच्या पदाधिकारी यांची बैठक संपन्न



सर्व औद्योगिक संघटना यांच्या वतीने मा. श्री. सुनिल फुलारी साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र व मा. श्री. महेंद्र पंडित साहेब, जिल्हा पोलीस प्रमुख कोल्हापूर यांचा स्वागतपर सत्कार करताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, स्मॅक अध्यक्ष सुरेन्द्र जैन व इतर मान्यवर उद्योजक



कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील पोलीस मुख्यालयाशी निगडीत असणाऱ्या विविध समस्यांचे निवेदन मा. श्री. सुनिल फुलारी साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र व मा. श्री. महेंद्र पंडित साहेब, जिल्हा पोलीस प्रमुख कोल्हापूर यांना देताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत मॅक चे इतर पदाधिकारी



कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील पोलिस मुख्यालयाशी निगडीत असणाऱ्या विविध समस्यां मा. श्री. सुनिल फुलारी साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र व मा. श्री. महेंद्र पंडीत साहेब, जिल्हा पोलीस प्रमुख कोल्हापूर यांच्या समोर मांडताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, संचालक संजय पेंडसे समवेत मॅक चे व इतर असोसिएशनचे पदाधिकारी



उद्योजकांच्या विविध समस्या जाणून घेवून त्या सोडविणेसाठी सविस्तर चर्चा करताना मा. श्री. सुनिल फुलारी साहेब, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र व मा. श्री. महेंद्र पंडित साहेब, जिल्हा पोलीस प्रमुख समवेत मान्यवर उद्योजक बंधू

## मॅक च्या नूतन इमारत प्लॅन व बांधकाम बाबत मॅक येथे बैठक संपन्न




मॅक च्या नूतन इमारत प्लॅन, बांधकाम व इंटेरिअर बाबत आर्किटेक्ट अविनाश नाईक साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा करताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, बिल्डिंग कमिटी अध्यक्ष संजय जोशी, ऑन.सेक्रेटरी विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर व काँट्रॅक्टर वैभव हांजे





मॅक च्या नूतन इमारतीच्या बांधकामाची पाहणी करताना आर्किटेक्ट अविनाश नाईक समवेत मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, बिल्डिंग कमिटी अध्यक्ष संजय जोशी, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर, काँट्रॅक्टर वैभव हांजे व इतर

# महावितरण कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व मॅक पदाधिकारी, सभासद यांची विविध समस्या बाबत मॅक येथे बैठक संपन्न



कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील महावितरण कार्यालय व
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यालयाशी निगडीत असणाऱ्या विविध समस्या श्री. दत्तात्रय बनगे कार्यकारी अभियंता,
श्री. विनोद घोलप उप अभियंता, महावितरण विभाग, श्री. एस.व्ही. अपराज उप अभियंता,
श्री. रणजीत बिरंजे उप अभियंता, ई अँड एम, मऔवि महामंडळ, कोल्हापूर, संबंधित अधिकारी वर्ग यांच्या समोर
मॅक च्या वतीने मांडताना व सविस्तर चर्चा करताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत मॅक चे इतर पदाधिकारी व मान्यवर उद्योजक



स्ट्राईव्ह प्रोजेक्ट मधील KPI च्या अनुषंगाने एचआर, मॅनेजर, सुपरवायजर यांना प्रोजेक्टची सविस्तर माहिती
व ट्रेनिंग श्री. ओंकार कुलकर्णी यांनी दिले त्याप्रसंगी उपस्थित स्ट्राईव्ह प्रोजेक्ट प्रमुख श्री. संजय पेंडसे
समवेत कंपनीमधील एचआर, मॅनेजर, सुपरवायजर





स्ट्राईव्ह प्रोजेक्ट मधील KPI च्या अनुषंगाने तुषार इंडस्ट्रीज येथे वर्कशॉप ट्रेनिंग घेताना स्ट्राईव्हच्या विद्यार्थिनी

# मॅक व एमएसएमई यांच्या संयुक्त विद्यमाने 7 QC Tools बाबत मॅक येथे सेमिनार संपन्न




मॅक व एमएसएमई (Technology Development Center PPDC) यांच्या संयुक्त विद्यमाने कागल-हातकणंगले पंचतारांकित औदयोगिक वसाहतीमधील उद्योजक बंधू-भगिनींना 7 QC Tools बाबत सविस्तर माहिती मिळावी या हेतूने श्री. ओंकार कुलकर्णी यांचा सेमिनार आयोजित केला होता. त्याप्रसंगी मा. श्री. ओंकार कुलकर्णी यांचा स्वागतपर सत्कार करताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत मॅक चे संचालक संजय पेंडसे व एमएसएमई चे विजय पवार



कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील उपस्थित उद्योजक बंधू-भगिनींना 7 QC Tools बाबत सविस्तर माहिती देताना श्री. ओंकार कुलकर्णी

# निक्षय मित्र अंतर्गत केंद्रीय पथकाची क्षयमुक्त बाबत माहिती देण्यासाठी मॅकला भेट



मा. पंतप्रधान क्षयमुक्त भारत अभियान अंतर्गत कोणतीही दानशूर व्यक्ती किंवा संस्था क्षय रुग्णांना दत्तक घेऊन निक्षय मित्र बनून सहा महिने ते एक वर्षापर्यंत पोषण आहार किट देऊ शकते. कोल्हापूर जिल्ह्यामधील क्षयरुग्णांना दत्तक घेण्यासाठी दानशूर व्यक्ती व संस्था यांनी पुढे येऊन जिल्हा क्षयमुक्त करण्यास हातभार लावावा असे आवाहन केंद्रीय क्षयरोग विभाग, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारचे राष्ट्रीय सल्लागार श्री. धर्मा राव व सहाय्यक संचालक, राज्य क्षयरोग विभाग, महाराष्ट्र राज्य डॉ.दिगंबर कानगुले यांनी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकलंगले (मॅक) येथील कै. रामप्रताप झंवर सभागृह येथे आयोजित बैठकीत बोलत होते. जिल्हा क्षयमुक्त करण्याबाबत आम्ही नक्कीच प्रयत्न करु अशी ग्वाही मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे यांनी सदर बैठकीत दिली. सदर केंद्रीय पथकाबरोबर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वंदना वसावे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. माधव ठाकूर, डॉ. परवेज पटेल, श्री. शिवाजी बर्गे जिल्हा क्षयरोग केंद्राचे विशाल मिरजकर, धनंजय परीट, दिया कोरे, गौरी खैरमोडे, सुनिता नरदगे, पूनम कुंभार, विनोद नायडू, एकनाथ पाटील, एस.टी.एस व एस.टी.एल.एस. कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.





# आयात-निर्यातीबाबत हवा सजगपणा

डॉ. जयंतीलाल भंडारी
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

अर्थनीती

***सध्याच्या स्थितीत जागतिक बाजारात कमी होणाऱ्या उलाढाली आणि जागतिक स्तरावरची कमी होणारी निर्यात पाहता भारताला आगामी काळात निर्यातीबाबत सजगपणे निर्णय घ्यावे लागणार आहेत. आता इस्त्राईल-इराण यांच्या संघर्षामुळे जागतिक बाजारासमोर नव्याने उभे राहणारे आव्हान पाहता निर्यात वाढवणे आणि आयातीवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी विशेष रणनितीसह पुढची वाटचाल करावी लागणार आहे. भारताच्या वस्तु आयातीत चीनचा वाटा लक्षणीयरित्या वाढत असून तो ३० टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर पोचला आहे. त्याचे मूल्य साधारणपणे १०१ अब्ज डॉलर झाले आहे. या आयातीला आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया मोहिमेतून चाप बसवावा लागणार आहे. निर्यात क्षेत्रात वेगाने वाढ करण्यासाठी सेवेची गुणवत्ता, दक्षता, उकृष्ट्ता तसेच सुरक्षेवरून अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि ही बाब लक्षात घ्यावी लागेल.***

---

अखेर केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील बंदी मागे घेतली. प्रामुख्याने हा निर्णय कांद्याचे रब्बी हंगामातील चांगले उत्पादन झाल्याने आणि खरीपाच्या काळात विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता गृहित धरून घेतला. केंद्र सरकारने कांद्यासाठी किमान आधारभूत मूल्य ५५० डॉलर टन निश्चित केले आहे. यावर ४० टक्के निर्यात शुल्क देखील आकारले आहे. यामुळे कांदा उत्पादकांच्या उत्पन्नात वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

सरकारच्या कालच्या निर्णयामुळे देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. तत्पूर्वी डिसेंबर २०२३ मध्ये केंद्र सरकारने २०२२ च्या खरीप हंगामातील घटलेले उत्पादन पाहता कांदा निर्यातीवर बंदी घातली होती. अर्थातच त्याचा परिणाम देशातर्गंत बाजारपेठेवर जाणवला. यादरम्यान देशात कांद्याच्या किंमती स्थिर राहिल्या. कारण २०२३-२४ मध्ये २.५५ कोटी टन कांदा उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली गेली आहे. परंतु कांद्याचे उत्पादन हे देशातील मागणी आणि निर्यातीची गरज पाहता पुरेसे आहे. विशेष म्हणजे बंदी असतानाही बांगलादेश, भूतान, युएई, श्रीलंका आदींना काही प्रमाणात कांद्याची निर्यात

रण्यात आली. साहजिकच याचा कांदा उत्पादकांना फायदा मिळणार आहे.

वास्तविक सध्याच्या स्थितीत जागतिक बाजारात कमी होणाऱ्या उलाढाली आणि जागतिक स्तरावरची कमी होणारी निर्यात पाहता भारताला आगामी काळात निर्यातीबाबत सजगपणे निर्णय घ्यावे लागणार आहेत. आता इस्त्राईल-इराण यांच्या संघर्षामुळे जागतिक बाजारासमोर नव्याने उभे राहणारे आव्हान पाहता निर्यात वाढवणे अणि आयातीवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी विशेष रणनितीसह पुढची वाटचाल करावी लागणार आहे.

विशेषत: अलिकडेच २८ एप्रिल रोजी आर्थिक थिंक टँक 'ग्लोबल ट्रेड अँड रिसर्च इनिशिएटिव्ह'च्या अहवालानुसार भारताच्या वस्तु आयातीत चीनचा वाटा लक्षणीयरित्या वाढत असून तो ३० टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर पोचला आहे. त्याचे मूल्य साधारणपणे १०१ अब्ज डॉलर झाले आहे. या आयातीला आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया मोहिमेतून चाप बसवावा लागणार आहे. विशेष म्हणजे अलिकडेच वाणिज्य मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आर्थिक वर्षात २०२३-२४ मध्ये भारतातून माल आणि सेवेची एकूण निर्यात ७७६.७८ अब्ज डॉलर राहिली आणि तत्पूर्वी ती २०२२-२३ मध्ये ४४७.४० अब्ज डॉलर होती. अशा वेळी गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत सेवा क्षेत्रातील निर्यातीत ३.५ टक्के वाढ होत ती आता ३३९.६२ अब्ज डॉलर राहत आहे. एकीकडे गेल्या आर्थिक वर्षात आयातमूल्य ८५४.८० अब्ज डॉलर राहत असताना २०२२- २३ वर्षात एकुण आयात मूल्य ८९८ अब्ज डॉलर राहिले होते. एकुणातच मागील वर्षाच्या आयातीत घट झाल्याने व्यापार तुटीत ३६ टक्के घट नोंदली गेली.

गेल्या वर्षात आयातीत घसरण होण्यामागे कारण म्हणजे तेलाच्या आयातीत झालेली घट. कच्च्या तेलाच्या किंमती कमी राहिल्याने गेल्या वर्षी तेलाच्या आयातीवर सुमारे १६ टक्के कमी खर्च झाला. अलीकडील काळात भारताच्या निर्यातीत एका वैशिष्टयपूर्ण पैलूने म्हणजे सेवा क्षेत्राने ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. भारत डिजिटल माध्यमातून प्रदान होणाऱ्या सेवा निर्यातीत जागतिक बाजारपेठेत आपला वाटा वाढवत आहे. डिजिटल माध्यमातून सेवा क्षेत्रातील निर्यातीत कॉम्प्युटर नेटवर्कचा वापर करून शिक्षण देणे, मेडिकल ट्रान्सस्क्रिप्शन, गेमिंग, मनोरंजन, आर्टिफिशियल इंटिलिजिन्स आदींसाठी कुशल तंत्रज्ञ, कुशल प्रोग्रॅमर आणि कोडिंग तज्ज्ञांच्या सेवेचा समावेश आहे. भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (जीसीसी) स्थापन होण्याचे प्रमाण वाढल्याने सेवा क्षेत्रातील निर्यात वाढत आहे. २०१५-१६ पासून ते २०२२-२३ या काळात भारतात 'जीसीसी'ची संख्या ६० टक्क्यांनी वाढत ती १६०० पर्यत पोचणे ही काही साधारण बाब नाही. जागतिक व्यापारी संघटनेच्या अहवालानुसार, डिजिटल माध्यमाशी संबंधित क्षेत्रातील निर्यात वेगाने वाढत असताना या क्षेत्रात भारताने जर्मनी आणि चीनला मागे टाकत जगात अमेरिका, ब्रिटन आणि आयर्लंडनंतर चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

सध्या भारताच्या निर्यातीच्या बाजारात जगातील प्रमुख अमेरिका,यूएई, युरोपियन युनियन, ब्रिटन, सिंगापूर, मलयेशिया, बांगलादेश, नेदरलँड, चीन अणि जर्मनीचा समावेश आहे. भारताची औषधांची निर्यातही २०२३- २४ मध्ये २७.९ अब्ज डॉलरवर पोचली आहे. २०२२-२३ मध्ये हा आकडा २५.४ अब्ज डॉलर होता. ही निर्यात एक दिवसांत वाढलेली नाही. यासाठी सरकारने प्रमुख औषधी सामग्री आणि जेनरिक औषधांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी दोन उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजना आणल्या. याचा लाभ औषध कंपन्यांना आता निर्यातीत मिळत आहे. आयफोनच्या निर्यातीत भारताने आघाडी घेतली आहे. आयफोन निर्माता कंपनी ॲपलने गेल्या वर्षात भारतातून दहा अब्ज डॉलरच्या आयफोनची निर्यात केली आणि तो विक्रमी आकडा मानला जात आहे. या योजनेर्तंगत कंपनीने २०२३-२४ मध्ये विकलेल्या फोनची किंमत ही २०२२-२३ मध्ये विकलेल्या आयफोनच्या किंमतीच्या तुलनेत दुप्पट म्हणजे एक लाख कोटी रुपये होती. भारतात एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीकडून एवढ्या किंमतीच्या उत्पादनाची निर्यात करण्याचा पहिलाच प्रसंग असावा.

ॲपल ही जगात मूल्य साखळी ठेवणारी पहिली कंपनी असून या कंपनीने भारताला देशार्तंगत बाजाराऐवजी निर्यातीसाठी केंद्र म्हणून स्थापित केले आहे. सध्याच्या युद्धजन्य स्थितीमुळे निर्माण झालेली आर्थिक आव्हाने पाहता भारतासाठी जागतिक बाजार आणि निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने मुक्त व्यापार करार (एफटीए) चे महत्त्व वाढत असून त्यात कोणाचेही दुमत

असण्याचे कारण होत नाही. भारताने आतापर्यंत तीन व्यापारी करार केले आहेत. भारत आणि संयुक्त अरब अमिरात (यूएई) यांच्यात मे २०२२ मध्ये द्विपक्षीय व्यापारी करार झाला आणि यात गेल्या दोन वर्षांत पंधरा टक्के वाढ नोंदविली गेली. यूएई हा भारतासाठी दुसरे मोठे निर्यातीचे ठिकाण, तिसरा मोठा व्यापारी भागीदार आणि चौथा मोठा गुंतवणूकदार देश आहे. असाच करार ऑस्ट्रेलियाशी झाल्याने भारताचा त्यांच्यासमवेत द्विपक्षीय व्यापार वाढला. गेल्या दहा मार्चला भारत आणि चार युरोपीय देशांचा समूह 'युरोपियन फ्री ट्रेड असोसिएशन' (इएफटीए) यांच्यात करार झाला. शिवाय गुंतवणूक आणि वस्तू तसेच सेवा क्षेत्रात उभय बाजूने चालना देण्यासाठी एफटीए करार देखील उपयुक्त आहे.

सध्याच्या काळात जगभरात भू राजकीय स्थिती बिघडत आहे आणि यात कच्च्या तेलाच्या किंमतीबरोबरच पुरवठा साखळीवरचे संकट देखील वाढण्याची चिंता आहे. परिणामी भारताच्या जागतिक बाजारात आणि निर्यातीवर देखील प्रतिकुल परिणाम होत आहे. अशावेळी भारताला निर्यात वाढविणे आणि चिनी वस्तूंच्या आयातीचे प्रमाण कमी करत रणनिती आखावी लागणार आहे. देशात सध्याच्या काळात उच्च व्याजदर आणि मालाला मागणी कमी राहत असल्याने निर्यातीच्या आघाडीवर/अडचणींचा सामना करणाऱ्या किरकोळ निर्यातदारांना कमी व्याजदरावर कर्ज देणारी आणि बँकांना त्या बदल्यात सरकारकडून अंशदान देणारी इंटरेस्ट इक्वलायजेशन स्किम (आयइएस) योजनेची मुदत ३० जून २०२४ रोजी संपत असून त्यास मुदतवाढ देणे फायद्याचे राहू शकते. याप्रमाणे विकसित अर्थव्यवस्था असणारे अनेक देश दीर्घपल्ल्याच्या सागरी वाहतुकीच्या आधारे दूरवरच्या देशांऐवजी जवळील देशांशी व्यापार करण्यावर भर देत आहेत. अशाच रणनितीवर भारताला भर द्यावा लागणार आहे. भारत माहिती आणि तंत्रज्ञानाच्या सेवा क्षेत्राच्या निर्यातीत अधिक आघाडी घेत असेल मात्र त्या निर्यात क्षेत्रात वेगाने वाढ करण्यासाठी सेवेची गुणवत्ता, दक्षता, उकृष्टता तसेच सुरक्षेवरून अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि ही बाब लक्षात घ्यावी लागेल.





# महिला उद्योजकांची वाढती व्याप्ती

शुभांगी कुलकर्णी
महिला प्रश्नांच्या अभ्यासक

***गेल्या काही वर्षांत स्टार्टअप उपक्रमात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न झाले आहेत. त्याचे सकारात्मक परिणामही दिसत आहेत. देशात सध्या आठ हजारांहून अधिक स्टार्टअप उपक्रमाचे नेतृत्व महिला उद्योजक करत आहेत.मात्र अजूनही व्यक्तिगत आणि सामाजिक आव्हानांचा महिलांना सामना करावा लागतो. महिलांची उद्योगशिलता ही केवळ देशाच्या आर्थिक विकासासाठी गरजेची नाही तर स्त्री-पुरुष भेदभावामुळे असलेली बंधने तोडण्यासाठी एक शक्तीशाली साधन म्हणून काम करू शकते. यासाठी महिलांनी स्वत:च पुढाकार घेत नाविण्याचा शोध घेतला पाहिजे. यासाठी कुटुंबातील पुरुष सदस्यांनी त्यांना प्रोत्साहन देणे आणि पुरेसे सहकार्य करण्याची गरज आहे.***

आर्थिक क्षेत्रात व्यापक बदल घडवून आणण्याबरोबरच व्यवसाय आणि उद्योगातील जोखीम, अनिश्चितता याचा सामना करण्याची योग्यता आणि पात्रता अंगी विकसित करणे म्हणजेच उद्योजक होय. जी व्यक्ती जोखीम उचलण्याची तयारी दाखवते त्याला धाडसी उद्योजक म्हटले जाते. देशात सुमारे निम्मी लोकसंख्या महिलांची असताना उद्योग, व्यापार, वाणिज्य यासारख्या आर्थिक क्षेत्रात मात्र सहभाग खूपच कमी आहे. यामागचे प्रमुख कारण म्हणजे उद्योगशिलतेच्या मानसिकतेचा अभाव. भारताच्या राष्ट्रीय नमूना सर्वेक्षण कार्यालयाच्या मते, देशातील उद्योग क्षेत्रात महिला उद्योजकांचा वाटा केवळ चौदा टक्के आहे. बेन अँड कंपनीच्या एका अहवालानुसार भारतात सुमारे २० टक्का उद्योगांची मालकी महिलांकडे आहे. अनेक महिला सर्वोत्तम उद्योगी कौशल्याच्या आधारावर वेगाने वाटचाल करत आहेत. ई-कॉमर्स, विज्ञान, जाहीरात, माध्यम, मनोरंजन आदी क्षेत्रात भारतीय महिला उद्योजक आघाडी घेताना दिसून येत आहेत.

२०१७ मध्ये महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअपचे प्रमाण दहा टक्के असताना ते २०२२ मध्ये १८ टक्क्यांपर्यंत पोचले. म्हणजेच प्रत्येक पाच स्टार्टअपपैकी किमान एका स्टार्टअपमध्ये महिलांचा सहभाग आहे. अर्थात हे चित्र समाधानकारक नाही. गेल्या काही वर्षांत स्टार्टअप उपक्रमांचा विकास आणि विस्तारासाठी अनेक महत्त्वाचे प्रयत्न झाले. सध्याच्या काळात देशात आठ हजारापेक्षा अधिक उपक्रमांचे नेतृत्व महिलावर्ग करत आहेत. त्या संस्थापक देखील आहेत. या स्टार्टअपचे एकूण भांडवल सुमारे २३ अब्ज डॉलर म्हणजेच १. ९० लाख कोटी रुपये आहे. या दशकाच्या अखेरपर्यंत महिला उद्योजकांच्या स्थितीत सुधारणा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. बेन अँड कंपनी आणि गुगलच्या २०१९ च्या अहवालानुसार २०३० पर्यंत महिला उद्योजकांचा वाटा सुमारे एक तृतियांशपर्यंत पोचू शकतो, असे म्हटले आहे.

एक दशकभरापूर्वीच्या अधिकृत आर्थिक जनगणनेनुसार भारतातील एकुण उद्योगांच्या केवळ चौदा टक्के नेतृत्व महिलांकडे आहे. आता हा वाटा वीस टक्क्यांवर पोचला आहे. महिलांकडून नेतृत्व करण्यात येणाऱ्या उपक्रमांतील सुमारे ६५ टक्के उद्योग हे ग्रामीण भागातील आहेत. दक्षिण राज्यांतील महिलांचा वाटा हा उत्तर भारतातील राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. मागच्या आर्थिक जनगणनेनुसार या उपक्रमांत सुमारे ८० टक्के महिलांचे उद्योग स्वयं अर्थसाह्यावर आधारित आहेत.

गेल्या काही वर्षांत सरकारच्या विविध योजनांनी महिलांच्या लघु उद्योगांना अंशदान देणे , सुलभपणे भांडवल उपलब्ध करून देणे, संभाव्य बाजारपेठ, खरेदीदार उपलब्ध करून देणे, कौशल्य विकासाला मदत करणे, क्षमतेत वृद्धी करणे, आर्थिक साक्षरता, सुक्ष्म अर्थसाह्य उपलब्ध करून देणे या सारख्या माध्यमातून मदतीचा प्रयत्न झाला आहे. उदा. मिशन शक्ती हा २०२१-२२ मध्ये महिला आणि बाल विकास मंत्रालयाने सुरू केलेला उपक्रम असून तो एकप्रकारे महिला सशक्तीकरणाचा कार्यक्रमआहे. या माध्यमातून महिला उद्योजकांना विविध मार्गाने मदत केली जाते. याचप्रमाणे सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाची समर्थ योजना देखील महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून आत्मनिर्भर होण्यासाठी प्रेरित करते. अन्नपूर्णा याजेनेनुसार खाद्य आणि हॉटेल, रेस्टॉरंटच्या व्यवसायात महिला उद्योजकांना ५० हजारांपर्यंत कर्ज दिले जाते. महिला विकास महामंडळाची उद्योगिनी योजना देखील गरीब महिलांना अर्थसाह्य करते आणि महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. ही योजना प्रामुख्याने देशातील ग्रामीण आणि दुर्गम भागात राहणाऱ्या अशिक्षित महिलांना मदत करणारी आहे.

अर्थात या सर्व योजनांमुळे आर्थिक घडामोडीत महिलांचा सहभाग वाढला आहे. मात्र अजूनही व्यक्तिगत आणि सामाजिक आव्हानांचा महिलांना सामना करावा लागतो. सर्वात मोठे आव्हान म्हणजे देशातील रुढीवादी विचार, परंपरा आणि निकष. महिलांना आतापर्यंत चूल आणि मूल यापुरतीच मर्यादित ठेवले गेले. तिने केवळ कौटुंबीक कर्तव्य पार पाडावीत, अशीच अपेक्षा केली जायची. त्यामुळे महिलांनी देखील स्वत:ची सीमारेषा आखून घेतली होती. पण ती साखळी तोडण्याचे काम होत आहे. तरीही ग्रामीण भागात अजूनही पुरेसे प्रोत्साहन मिळताना दिसत नाही. याशिवाय भारतात महिला उद्योजकांना भांडवल उभारणीसाठी अनेक समस्या येतात. त्यांना भांडवलाची व्यवस्था करताना आणि कर्ज मिळवताना अडचणींचा सामना करावा लागतो. महिलावर्ग प्रामुख्याने व्यवहारात प्रामाणिक असल्याचे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. तरीही महिलंना पुरेसेसहकार्य मिळत नाही. शिवाय महिला उद्योजकांना व्यवसाय चालवताना पुरक यंत्रणेच्या अभावाचा सामना करावा लागतो. व्यावसायिक सल्ला आणि प्रशिक्षण दिले जात नसल्याने त्यांना कौशल्य, ज्ञान आणि आत्मविश्वासाची उणीव भासत राहते.

महिला उद्योजकांना कौटुंबीक जबाबदारीशी ताळमेळ साधताना संघर्ष करावा लागतो. महिलांकडून घरातील जबाबदाऱ्या पार पाडण्याची अपेक्षा केली जाते आणि त्यामुळे त्यांना व्यवसायासाठी पुरेसा वेळ आणि ऊर्जा देणे कठीण होऊन जाते. महिला उद्योजकांना नेटवर्क, स्रोत आणि अनुभवांच्या अभावामुळे बाजारपेठेपर्यंत पोचताना अडचणी येतात आणि मर्यादा राहतात. परिणामी त्यांना ग्राहकवर्ग शोधणे, व्यवहार करणे, व्यवसायाची व्याप्ती वाढवणे या आघाडीवर अडचणी येतात. भारतीय महिला उद्योजकांना उद्योगांबाबतचे अचूक मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीचादेखील अभाव जाणवतो आणि परिणामी उद्योजकतेचे धडे मिळत नाहीत. उद्योगातील उणिवा, त्रुटी बाजूला करत उद्योग यशस्वी कसा करावा

याबाबतचे शास्त्रोक्त मार्गदर्शन मिळत नाही. उद्योग क्षेत्रात आघाडीच्या उद्योग समूहात क्वचितच महिला असल्याने स्वत:ला देखील उद्योजक म्हणून सिद्ध करताना प्रेरणा मिळत नाही किंवा अडचणी येतात. महिलांना बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती मिळवताना देखील अडथळ्याची शर्यत पार करावी लागते. म्हणून महिलांना नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आणि स्पर्धेत टिकून राहणे अडचणीचे होते. महिला उद्योजकांना स्वत:च्या क्षमतेवरून नेहमीच आत्मविश्वासाचा अभाव जाणवतो आणि त्यामुळे उद्योगशिलतेचे स्वप्न पूर्ण करण्यास ते मागेपुढे पाहतात. महिला उद्योजकांना प्रामुख्याने तंत्रज्ञान क्षेत्रात व्यवसाय यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण अणि प्रशिक्षण दिले जात नाही. यामुळे महिलांना स्वबळावर व्यवसाय सुरू करणे आणि विस्तार करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य आणि ज्ञान मिळवणे कठीण होऊन बसते.

महिलांची उद्योगशिलता ही केवळ देशाच्या आर्थिक विकासासाठी गरजेची नाही तर स्त्री–पुरुष भेदभावामुळे असलेली बंधने तोडण्यासाठी एक शक्तीशाली साधन म्हणून काम करू शकते. यासाठी महिलांनी स्वत:च पुढाकार घेत नाविण्याचा शोध घेतला पाहिजे. यासाठी कुटुंबातील पुरुष सदस्यांनी त्यांना प्रोत्साहन देणे आणि पुरेसे सहकार्य करण्याची गरज आहे. सरकार, समाज आणि स्थानिक समुदायांनी उद्योगशील अप्रशिक्षित महिलांची निवड करून त्यांना आवश्यक शिक्षण, प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आणि उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत करायला हवी. त्याचवेळी महिला उद्योगांनी तयार केलेल्या उत्पादनांचे वितरण करण्यासाठी पुरेसी व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास शहरातीलच नाही तर ग्रामीण क्षेत्रातील महिला उद्योजक देखील यशाचे नवे शिखर पादाक्रांत करू शकतील आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान अधोरेखित करु शकेल.


TECHNOMET
ENTERPRISES

SAVE ENVIROMENT SAVE POWER SAVE MONEY

Welcome **SUMMER** In a cool way with our HVLS Fans




**Available Sizes & Variants : 5 BLADES & 3 BLADES - 24 Ft/ 20 Ft/ 16 Ft/ 12 Ft**

**FEATURES**




| | | | |
|---|---|---|---|
| Aero Material & Blade Design | 23.5° Blade & Angleof Attack | Large Air Coverage | High Torque For Strong Speed |
| ROI of Less than a year | Improves Productivity | Zero Maintenance | Long Working Life |

+91 9850056421 / admin@technometent.co.in / aniket.mane@technometent.co.in / W72 MIDC Shiroli Kolhapur.



दृष्टिक्षेप

# बचतीची गंगा आक्रसतेय...

अभिजित कुलकर्णी
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

***केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार गेल्या अवघ्या ३ वर्षांमध्ये भारतीय कुटुंबांची निव्वळ बचत १ लाख कोटी रुपयांनी घटली आहे. २०२०-२१ या आर्थिक वर्षात कुटुंबांची निव्वळ बचत २३.२१ लाख कोटी रुपयांवर पोहोचली होती, परंतु तेव्हापासून त्यात सातत्याने घट होत असून २०२२-२३ या आर्थिक वर्षात १४.१६ लाख कोटी रुपयांवर आली आहे. सध्या आपण अशा स्थितीतून जात आहोत की जेथे सर्वच घटक तणावाखाली आहेत. उत्पन्नात अपेक्षेप्रमाणे वाढ झालेली नाही. मात्र जीवनशैलीवरचा खर्च वाढत आहे आणि महागाईही. अशा स्थितीत बचतीसाठी हाती पैसा उरत नाहीये. त्यामुळे बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी बचतीसाठीच्या योजनांवरील व्याजदर आकर्षक असले पाहिजेत. तसेच रोजगाराच्या, उत्पन्नाच्या संधींचे अवकाश विस्तारावे लागेल.***

भारताला हजारो वर्षांच्या धार्मिक-अध्यात्मिक संस्कृतीप्रमाणेच प्राचीन काळापासून चालत आलेल्या काही वित्तीय नियोजनाच्या परंपराही आहेत. अनेक दशकांपासून भारत हा बचतकर्त्यांचा देश म्हणून ओळखला जात आहे. 'अंथरुण पाहून पाय पसरावे' यांसारख्या म्हणी भारतीयांच्या खर्च करण्याच्या संतुलित मनोवृत्तीची साक्ष देणाऱ्या आहेत. प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भलेही भारतीयांचे दरडोई उत्पन्न कमी असेल; पण मिळणाऱ्या उत्पन्नातील काही ना काही भाग बचतीच्या रुपाने बाजूला काढून ठेवायचा, यांसारखी अर्थशास्त्रातील तज्ज्ञ मंडळींकडून सांगितली जाणारी सूत्रे भारतीय समाज वर्षानुवर्षांपासून दैनंदिन जीवनात अनुसरत आला आहे. ग्रामीण भागातील बचत गट, पतसंस्था, सहकारी बँका यांच्या अर्थकारणाला लोकांची ही बचतीची वृत्ती बळकटी देत आली आहे. आजही गावाखेड्यातील भाजीविक्रेते, फेरीवाले, छोटे व्यावसायिक पिग्मीच्या रुपाने पतसंस्थांमध्ये दैनंदिन उत्पन्नातील काही भाग जमा करत असतात. बहुसंख्य महिला पतीच्या उत्पन्नातून घरखर्च चालवण्यासाठी

दिलेल्या रकमेतील काही रक्कम बचत खात्यांत ठेवत असतात. पूर्वी बँकांचे जाळे विस्तारलेले नव्हते तेव्हा पोस्टामध्ये, घरातील बॅगांमध्ये हे पैसे साठवले जात असत आणि त्यातून एखादी मोठी वस्तू, सोनंनाणं खरेदी केलं जात असे. आजही ही वित्तीय शिस्त पाळली जाते. जागतिकीकरणानंतरच्या काळात भारतीयांच्या जपून खर्च करण्याच्या मानसिकतेला तुच्छ लेखणारा वर्ग समाजात उदय पावला; परंतु आज तीन दशकांनंतर या वर्गालाही आपली भूमिका चुकीची असल्याचे कळून चुकले आहे. नवअर्थकारणातील तज्ज्ञ मंडळी तर आता उत्पन्नातील काही भाग आधी बचतीसाठी–गुंतवणुकीसाठी बाजूला काढा आणि उर्वरीत पैशांमध्ये खर्चाचे नियोजन करा असे सांगत आहेत; परंतु बदलत्या काळात वाढत चाललेल्या महागाईमुळे आणि कमी होत चाललेल्या उत्पन्नाच्या, रोजगाराच्या संधींमुळे, आर्थिक अशा श्वततेमुळे भारतीयांची बचत आक्रसत चालली आहे. विशेषतः कोरोना महामारीनंतरच्या गेल्या तीन–चार वर्षांमध्ये भारतीयांच्या बचतीवर अत्यंत प्रतिकूल परिणाम झाला आहे. ही बाब कुणा खासगी संस्थेच्या पाहणीतून समोर आलेली नसून केंद्र सरकारच्या आकडेवारीतूनच स्पष्ट झाली आहे. त्यानुसार अवघ्या ३ वर्षांमध्ये भारतीय कुटुंबांची निव्वळ बचत ९ लाख कोटी रुपयांनी  कमी होऊन २०२२–२३ या आर्थिक वर्षात १४.१६ लाख कोटी रुपयांवर आली आहे.  २०२०– २१ या आर्थिक वर्षात कुटुंबांची निव्वळ बचत २३.२९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली होती, परंतुतेव्हापासून त्यात सातत्याने घट होत आहे. २०२१–२२ या आर्थिक वर्षात कुटुंबांची निव्वळ बचत १७.१२ लाख कोटी रुपयांवर घसरल्याचे मंत्रालयाने म्हटले आहे. २०२२–२३ या आर्थिक वर्षात ती आणखी कमी होऊन १४.१६ लाख कोटी रुपये झाली, जी  गेल्या पाच वर्षांतील नीचांकी पातळी आहे. यापूर्वी, २०१७–१८ मध्ये निव्वळ देशांतर्गत बचतीची सर्वात कमी पातळी १३.०५ लाख कोटी रुपये होती. २०१८–१९ मध्ये ते १४.९२ लाख कोटी रुपये आणि २०१९–२० मध्ये १५.४९ लाख कोटी रुपये झाली. गतवर्षी 'आरबीआय'ने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष २०२३ मध्ये भारतातील देशांतर्गत बचत ५.१ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे दिसून आले होते.  कौटुंबीक बचतीची क्षमता ही अनेक कारणांमुळे कमी झाली आहे. साधारणपणे घरगुती बचत दरात घट होण्यामागे महागाईबरोबरच वाढता खर्च हा घटक देखील तितकाच जबाबदार आहे. मात्र नेहमीच असेघडत नाही. आरबीआयच्या गतवर्षीच्या आकडेवारीनुसार देशातील कुटुंबाच्या निव्वळ आर्थिक स्थितीत वर्ष २०२२–२३ मध्ये घसरण नोंदवली गेली आणि ती १३०.८० ट्रिलियन रुपये राहिली. २०२१–२२ या काळात १७० ट्रिलियन रुपये होती.

सध्या समोर आलेल्या आकडेवारीमध्ये कोरोना महामारीच्या कालखंडाचा विचार महत्त्वाचा ठरतो, कारण त्या काळात ३० ते १०० दिवस हजारो–लाखो कुटुंबांचे उत्पन्न शून्यावर आले होते. अशा प्रतिकूल काळात गाठीशी असलेला पैसा वापरण्याशिवाय गत्यंतर नसते. तसेच मुलभूत खर्च भागवण्यात बचतीची रक्कम खर्ची होऊ लागल्याने नव्याने बचत करण्याची क्षमताच राहात नाही. कोरोना महामारीचा संसर्ग संपला तरी त्याचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम दीर्घकाळ कायम राहिले. त्यामुळे आजही अनेक कुटुंबांचे कोलमडलेले अर्थकारण पूर्ववत झालेले नाहीये. या काळात कर्जांची उचल वाढत गेल्याने त्याच्या हप्त्यांचा भार वाढत गेला आहे. मुळातच, गेल्या दोन दशकांमध्ये कर्ज काढण्याची वृत्ती भारतातप्रचंड वाढत गेली आहे. वाहन, घर, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांसह अनेक गोष्टींसाठी सुलभ हप्त्यात कर्जाची उपलब्धता सहजगत्या होऊ लागल्यामुळे जीवनशैली उंचावण्याच्या प्रवासात कर्जांचे डोंगर वाढत गेले. यामध्ये क्रेडिट कार्डनी मोठी भर घातली. 'ऋण काढून सण साजरे करु नयेत' ही भारतीयांची पारंपरिक शिकवणूक आहे. पण पाश्चिमात्यांच्या प्रभावाने ती पुसून टाकण्यात आली. पण क्रेडिट कार्डमुळे हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाल्याचे दिसले आहे. रिझर्व्ह बँकेच्या एका आकडेवारीनुसार भारतातील क्रेडिट कार्डची एकूण थकबाकी २ लाख कोटींवर गेली आहे. कर्जाच्या हप्त्यांचा बोजा पडला की बचतीसाठीची तरतूद करणे मुश्किल होऊनबसते. त्यामुळेच गेल्या तीन वर्षांत बचतीला ओहोटी लागल्याचे दिसतआहे.

या आकडेवारीचे विश्लेषण करताना काही जणांनी एसआयपीच्या माध्यमातून म्युच्युअल फंडांमध्ये वाढलेल्या पैशांच्या ओघाकडे लक्ष वेधले आहे. त्यामध्ये तथ्य असले तरी यामध्ये ग्रामीण भागातील लोकांचा

सहभाग किती आहे, सर्वसामान्यांचा हिस्सा किती आहे हे तपासून पहावे लागेल. मूळ मुद्दा आहे तो बचतीसाठीच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि बचतीचे संस्कार पुन्हा रुजवण्याचा. विशेषतः आजच्या तरुणपिढीला बचतीचे महत्त्व नव्याने सांगण्याची गरज आहे. वॉरेन बफेट यांच्यासारखा जगप्रसिद्ध अब्जाधिश आणि अर्थतज्ज्ञही 'डू नॉट सेव्ह व्हॉट इज लेफ्टआफ्टर स्पेंडिंग, बट स्पेंड व्हॉट इज लेफ्ट आफ्टर सेव्हिंग' म्हणजेच खर्चातून शिल्लक राहिलेल्या पैशातून बचत करण्याचा विचार करण्यापेक्षा बचत करुन शिल्लक राहिलेल्या पैशांतून खर्चाचे नियोजन करा, असा सल्ला देतात. अमेरिकेतील प्रसिद्ध आंत्रप्रेन्युअर जॉन होप ब्रायंट हेदेखील 'यू कॅन मेक मनी टू वेज– मेक मोअर ऑर स्पेंड लेस' म्हणजेच तुम्हाला अर्थसंचय करायचा असेल तर भरपूर कमवा किंवा खर्च कमी करा' असे सांगतात. चाणक्यनीतीही भविष्यात येणाऱ्या संकटांसाठी धनसंचय गरजेचा असल्याची शिकवण देते. त्यामुळेच पाश्चिमात्य प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतामध्ये बचतीचे संस्कार अधिक खोलवर रुजले आहेत. वर्तमानातील उत्पन्नापेक्षा कमी खर्च करुन केलेल्या बचतीतून भविष्य सुरक्षित करणे ही शहाणीव भारतीयांची ओळख आहे. २००८ च्या जागतिक आर्थिक मंदीच्या काळातपाश्चिमात्य देशांच्या अर्थव्यवस्था जेव्हा कोलमडत होत्या तेव्हा भारतीय अर्थव्यवस्थेला तारण्यामध्ये दोन महत्त्वाच्या घटकांचा समावेश होता. एक म्हणजे भारतीयांची बचत आणि दुसरा म्हणजे फॉरेन रेमिटन्स अर्थात परदेशातील भारतीयांनी भारतात पाठवलेला पैसा. असे असताना आज जर बचतीचा आकडा नीचांकी पातळीवर जात असेल तर त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. सध्या आपण अशा स्थितीतून जात आहोत की जेथे सर्वच घटक तणावाखाली आहेत. उत्पन्नात अपेक्षेप्रमाणे वाढ झालेली नाही. मात्र जीवनशैलीवरचा खर्च वाढत आहे आणि महागाईही. अशा स्थितीत बचतीसाठी हाती पैसा उरत नाहीये. त्यामुळे बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी बचतीसाठीच्या योजनांवरील व्याजदर आकर्षक असले पाहिजेत. तसेच रोजगाराच्या, उत्पन्नाच्या संधींचे अवकाश विस्तारावे लागेल.


खटक्यावर बोट
ठेवायची आता गरजच नाही
टाकी भरली की पाण्याची मोटर आपोआप बंद...
संपत आली की मोटर आपोआप सुरु !
शिवाय मोटरला संरक्षणही !

ती तुमचं ऐकणार
जाग्यावरूनच आदेश द्या
असाल तिथून आदेश द्या...
ॲटोमॅटीक तंत्राने लाईट, टीव्ही, एअरकंडिशनर ,
पाण्याची मोटर इ. चालू किंवा बंद करा !

स्पेशल ऑफर !

मोटर ऑटो स्वीच
2999**/-
रुपयांमध्ये फक्त !

घर ॲटोमॅटीक बनवा
3999**/-
रुपयांमध्ये फक्त !

**T & C apply
*ऑफर कालावधी मर्यादित

अधिक माहितीसाठी संपर्क :
92 60 70 1000

Smart Art World
Home automation

169, ई वॉर्ड, जिओ लाईफ लगत,
हॉटेल वृषाली जवळ,
ताराबाई पार्क, कोल्हापूर



कव्हर स्टोरी

# दिलासादायक सलामी; पण...

सीए संतोष घारे
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

***प्रचंड वाढलेल्या उष्म्यामुळे अवघा देश ज्याची प्रतीक्षा करत होता तो मान्सून अगदी वेळेवर अंदमानात दाखल झाला आहे, ही नुसती वार्ताच लाखो जणांना गारवा देऊन गेली. मान्सूनच्या पावसाबाबत प्रामुख्याने दोन दृष्टीकोन आहेत. एक म्हणजे बिगर कृषी समाजाचा आणि दुसरा शेतकऱ्यांचा. शेतीवर अवलंबून नसणारा लोकसमूह पावसाळ्याच्या चार महिन्यात धुवाँधार पाऊस पडतो की नाही, धरणे भरतात की नाही यावर लक्ष ठेवून असतो; पण शेतकऱ्यांसाठी मान्सूनचे वेळेवर आगमन होण्याबरोबरच त्याचा पुढील प्रवास महत्त्वाचा असतो. हवामान बदलांच्या काळात कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढतो, पण तो शेतीसाठी प्रतिकूल ठरतो. त्यामुळे मान्सूनच्या आगमनाबरोबरच त्याचे वितरण योग्य राहणे गरजेचे आहे. अन्यथा सरासरी गाठली जाईल, पण त्या पावसाचा खरीपाला फायदा होईलच असे नाही.***

देशातील ऐंशी-नव्वदीतील पिढीच्या तोंडी सध्या एकच गोष्ट सातत्याने ऐकायला मिळत आहे, ती म्हणजे 'असा उन्हाळा आम्ही कधीच पाहिला नाही' ! याचे कारण वैशाखाचे आगमन झाल्यानंतर सुरुवातीला काहीसा खाली घसरू लागलेल्या तापमानाच्या पाऱ्याने शेअर बाजाराप्रमाणे उसळी घेत पन्नाशीच्या दिशेने प्रवास सुरू केल्यामुळे, तसेच हवेतील आर्द्रता वाढू लागल्यामुळ असह्य स्थितीचा सामना देशातील जनता करत आहे. गावाखेड्यांमध्ये या जोडीला पाचवीला पूजलेल्या भारनियमनामुळे आणि पाणीटंचाईमुळे कमालीची दुर्दशा दिसून येत आहे. अशा स्थितीत सबंध देश आकाशाकडे डोळे लावून मान्सूनची प्रतीक्षा करत आहे.

भारतीय हवामान खात्याने यंदा समाधानकारक आणि चांगला पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे. अंदमान-निकोबार बेटसमूह आणि मालदीवमध्ये मान्सूनचे आगमनही झाले आहे. सद्यस्थितीत बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रात ढगांची दाटी झाल्याचे सांगितले जात आहे. यंदा वेळेआधीच मान्सूनचे केरळात आगमन होणार असल्याचा अंदाज असून महाराष्ट्रातही मान्सून लवकरच दाखल होणार आहे. भारतीय मान्सूनवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांमध्ये एल निनोची भूमिका महत्त्वाची असते. पण यंदा एल निनो कमकुवत होत असून ला निनाची स्थिती सक्रिय होत आहे. ला निना बरोबरच हिंद महासागरातही कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. हवेच्या दाबाची ही परिस्थितीही चांगल्या मान्सूनसाठी अनुकूल आहे. साधारणतः ४ जूनपर्यंत मान्सून तळकोकणात महाराष्ट्रात दाखल होऊ शकतो. मागील ५ वर्षांची आकडेवारी बघितली तर, २०१९ मध्ये ८ जून रोजी मान्सून केरळात दाखल झाला होता. २०२० मध्ये १ जूनला मान्सून केरळमध्ये आला होता. २०२१ मध्ये ३ जून रोजी,

२०२२ मध्ये २९ मे आणि २०२३ मध्ये ८ जूनला मान्सून केरळमध्ये आला होता.

मान्सूनच्या पावसाबाबत प्रामुख्याने दोन दृष्टीकोन आहेत. एक म्हणजे बिगर कृषी समाजाचा आणि दुसरा शेतकऱ्यांचा. शेतीवर अवलंबून नसणारा लोकसमूह पावसाळ्याच्या चार महिन्यात धुवाँधार पाऊस पडतो की नाही, धरणे भरताहेत की नाही यावर लक्ष ठेवून असतो. कारण त्यांच्यासाठी पाणीटंचाई जाणवू नये हा मुख्य मुद्दा असतो. यामध्ये नोकरदार, व्यावसायिक, उद्योजक आणि प्रामुख्याने शहरी लोकसमूहाचा समावेश होतो. शहरांची गरज भागवणारी धरणे भरल्यास त्यावर्षीचा मान्सून चांगला आहे अशी या लोकांची धारणा बनते. पण शेतकऱ्यांसाठी मान्सूनचे वेळेवर आगमन होण्याबरोबरच त्याचा पुढील प्रवास महत्त्वाचा असतो. हवामान बदलांच्या काळात कमी कालावधीत जास्त पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाचे दिवस कमी होत चालले आहेत. अतिवृष्टी, ढगफुटीसारख्या घटना वाढत आहेत. पाणलोट क्षेत्रात किंवा धरण क्षेत्रात अशा प्रकारची ढगफुटी झाल्यास त्यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढतो; पण शेतीक्षेत्र असणाऱ्या भागात कमी काळात जास्त पडलेला पाऊस हा बहुतांश वेळा नुकसानदायकच ठरतो. त्यामुळे मान्सूनच्या आगमनाबरोबरच त्याचे वितरण योग्य राहणे गरजेचे आहे. अन्यथा सरासरी गाठली जाऊनही त्या पावसाचा खरीपाला फायदा होईलच असे नाही.

मान्सूनचे हे सर्व महत्त्व लक्षात घेता अंदमानात दमदार सलामी दिल्याचा आनंद वर्षभर टिकण्यासाठी पुढील चार महिन्यांमध्ये पावसाचे वितरण सर्वदूर सुयोग्य पद्धतीने होणे गरजेचे आहे. मागील काळात ऐन आगमनाच्या वेळेला बंगालच्या उपसागरामध्ये किंवा अरबी समुद्रामध्ये चक्रीवादळे निर्माण झालेली दिसून आली. यामुळे मान्सूनच्या प्रगतीत अडथळे निर्माण झाले आणि पुढे पावसात खंडही पडले. आपल्याकडील बहुतांश शेतकरी आजही मृग नक्षत्रावर शेतीत बियाणांची पेरणी करत असतो. साधारणतः ७ जूनच्या सुमारास मान्सूनचे आगमन होईल ही त्याची अपेक्षा असते. अशा वेळी जून महिन्यात पावसात खंड पडल्यास पेरणीसाठी केलेला सर्व खर्च मातीमोल होतो आणि त्याच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावते. त्यामुळे मान्सूनमध्ये खंड किती पडतात, ते किती दिवस राहतात हेही पाहणे महत्त्वाचे आहे. अलीकडील काळात हवामान अंदाजात स्थानिकता आणि अचूकता दोन्हीही वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळोवेळी या अंदाजानुसार आपल्या भागातील कृषी अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने पेरणीचे नियोजन करायला हवे.

दमदार मान्सूनच्या अंदाजामुळे शासन-प्रशासनानेही आपली तयारी काटेकोरपणाने ठेवायला हवी. अल निनोचा प्रभाव वाढल्यास पावसाचे प्रमाण वाढून महापुराचे संकट ओढावू शकते. त्यादृष्टीने आपत्कालीन व्यवस्थापनासाठीची सर्व व्यवस्था आतापासूनच तयार ठेवायला हवी. विशेषतः कोल्हापूर, सांगली, चिपळूण, मुंबई आदी भागामध्ये मागील काळातील चुकांपासून धडा घेऊन सुधारणा केल्यास अतिपाऊस झाला तरी जीवित वा वित्तहानी किमान पातळीवर आणण्यात यश येऊ शकेल. शेवटचा मुद्दा म्हणजे राज्याच्या नद्या व धरणांमधील गाळ काढण्याच्या योजना गतिमानतेने राबवायला हव्यात. जेणेकरुन दमदार पर्जन्यवृष्टी झाल्यास आपली साठवणूक वाढेल आणि पुढील वर्षीच्या पावसापर्यंत पाणीटंचाई टाळता येऊ शकेल.

भारतीय अर्थव्यवस्थेत मान्सूनला खूप महत्त्व आहे. मान्सूनचे आगमन होण्यास उशीर झाला किंवा पुरेसा पाऊस झाला नाही, तर त्याचे गंभीर परिणाम अर्थव्यवस्थेवर होताना दिसतात. मान्सूनच्या आगमनाला विलंब झाल्यास महागाईवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. महागाई मोठ्या प्रयत्नातून आटोक्यात आणली जात आहे. निसर्गाच्या कोपामुळे हे प्रयत्न निष्फळ ठरू शकतात. भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान १५-२० टक्के आहे. सिंचन सुविधांचा विस्तार होऊनही आपल्या देशातील ५० टक्के शेती मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस कमी किंवा उशिरा झाला तर शेती उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. तसेच विकासावर परिणाम होऊन महागाई वाढू शकते. २०१५ व २०१७ ही दोन वर्षे महाराष्ट्रात भीषण दुष्काळी स्थिती होती तेव्हा कृषीक्षेत्राचा विकास दर दीड ते दोन टक्क्यांनी घसरला होता. दुष्काळी स्थितीमुळे कृषी व संलग्न क्षेत्रात दोन वर्षे मंदी दिसून आली होती. कृषीसामग्रीसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये मागणी आक्रसल्याचे दिसले होते. त्यातून रोजगारावरही प्रतिकूल परिणाम झाला होता.

या पार्श्वभूमीवर यंदा वेळेवर दाखल झालेला मान्सून पुढीलचार महिने धुवाँधार बरसावा हीच सर्वांची आर्त इच्छा आहे. विशेषतः महागाईच्या दृष्टीने विचार करता मान्सूनवर सध्या सर्वांची भिस्त आहे. रिझर्व्ह बँकेने सलग ८ वेळा रेपोदर स्थिर ठेवण्यामागे जागतिक कारणांबरोबरच देशांतर्गत अन्नधान्य महागाईचाही मुद्दा आहे, हे लक्षात घ्यायला हवे. मागील दोन वर्षांपासून देशातील रिअल इस्टेट आणि ऑटोमोबाईल या अर्थव्यवस्थेत आणि जीडीपीसह रोजगारनिर्मितीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या क्षेत्रांमध्ये जबरदस्त तेजी दिसून आली आहे. एप्रिल महिन्यात किरकोळ वाहन विक्री म्हणजे वितरकांनी ग्राहकांना विकलेल्या वाहन संख्येत २७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रवासी वाहने, दुचाकी, तीन चाकी इत्यादी सर्वच वाहनांची विक्री या महिन्यात मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशनच्या अहवालात म्हटले आहे. यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत सात प्रमुख शहरांमधील निवासी विक्रीत १४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. औद्योगिक उत्पादनाचा आलेखही उंचावत आहे. या सर्वांच्या मुळाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ग्रामीण भागातून वाढलेली मागणी कारणीभूत आहे आणि ती वाढण्याचे मुख्य कारण मान्सूनची समाधानकारक बरसात हे आहे.

# विनम्र आवाहन




*फुल ना फुलाची पाकळी हवी...*
*साकारण्या संस्थेची इमारत नवी !*

नमस्कार !

उद्योजक मित्र हो, सातत्याने गेली 16 वर्षे आपल्या समोर चाललेला आपल्या असोसिएशनचा प्रवास एका स्वप्नपूर्तीच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. संस्थेने पसरलेल्या विशाल पंखावर आता फुंकर मारुन जीव ओतायचा आहे. आपल्याला अतिभव्य अशा नूतन इमारतीचा संकल्प करायचा आहे.

सध्याच्या आपल्या कार्यालयाशेजारीच एक भव्यदिव्य वास्तुरेखांकन आम्ही बनवलेले आहे. हे रेखांकन बनवताना भविष्यात लागणाऱ्या उद्योजकांच्या सर्व गरजांचा विचार केलेला आहे. नूतन वास्तूमध्ये उद्योगाच्या सोईसाठी एक भव्य सभागृह, संस्थेसाठी सुसज्ज ऑफीस, ग्रंथालय, उद्योजकांसाठी कॅन्टीन, गेस्ट साठी कॅफेटेरिया, आवश्यक गोष्टींसाठी दुकाने, विविध ऑफिसेस, बँक तसेच सर्व उद्योगातील कुशल कामगारांची गरज लक्षात घेऊन "कौशल्य विकास केंद्र" करण्याचा मानस केला आहे. या केंद्रासाठी लागणाऱ्या मशीन्स व टुलरुमचा देखील विचार केलेला आहे. सदर वास्तुच्या स्वप्नपूर्ततेसाठी आपल्याच लोकांकडून आर्थिक मदत जमा करावयाची आहे. यासाठी आपल्या सारख्या दानशूर व्यक्तिंकडून आम्ही मदतीची अपेक्षा करीत आहोत. आपण दिलेल्या एका दान-पाकळीने या फुलाला आकार येणार आहे. आपण आपल्याच नावाने, अथवा आस्थापनेच्या नावाने किंवा आपल्या प्रियजनांच्या नावाने देणगी देऊ शकता. सदरची देणगी ही इन्कमटॅक्स नियमानुसार 80 G व CSR या दोन्हीसाठी पात्र असून संस्थेला 80 G व CSR ही दोन्ही सर्टिफिकेट नोंदणीकृत मिळालेली आहेत.

आपण एखाद्या भागाचा खर्च देखील उचलू शकता. आपल्या माहिती करिता सदर कामाचे रेखांकन व खर्चाचे अंदाज पत्रक सोबत देत आहोत. आपली ही मदत संस्थेच्या इतिहासात कायमचीच कोरली जाणार आहे व येणाऱ्या नवउद्योजक पिढ्यांना तो एक आदर्श व प्रेरणास्त्रोत असेल.

| श्री. सुरेश क्षीरसागर | श्री. विठ्ठल पाटील | श्री. संजय जोशी | श्री. मोहन कुशिरे | श्री. हरिश्चंद्र धोत्रे |
|---|---|---|---|---|
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | बिल्डींग कमिटी-अध्यक्ष | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| 8308949500 | 9881204647 | 9225803098 | 9604112341 | 9422412903 |



पर्यावरण

# हरित अर्थव्यवस्थेची दुसरी बाजू

सुनीता नारायण
ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ, नवी दिल्ली

***संपूर्ण जग हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. हे सर्व सौर आणि पवनसारख्या शाश्वत ऊर्जेच्या भरवशावर करत असून परिणामी गॅसची कसर भरुन काढली जाईल. वाहतूक व्यवस्थेतील तेलाची गरज संपुष्टात आणण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांकडे संपूर्ण जग वळत आहे. उद्योग आणि ऊर्जेला जीवाश्म इंधनाची गरज भासणार नाही यासाठी हायड्रोजनकडे जग वळत आहे. या तीन मोठ्या बदलांच्या आधारावर जगाचे तापमान वाढीला कारणीभूत असलेल्या उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ शकते, अशी आशा आहे. मात्र हरित जगाकडे नेणाऱ्या व्यापार तंत्राच्या मॉडेलचे काय करणार?***

संपूर्ण जग हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. हे सर्व सौर आणि पवनसारख्या शाश्वत ऊर्जेच्या भरवशावर करत असून परिणामी गॅसची कसर भरुन काढली जाईल. वाहतुक व्यवस्थेतील तेलाची गरज संपुष्टात आणण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांकडे संपूर्ण जग वळत आहे. उद्योग आणि ऊर्जेला जीवाश्म इंधनाची गरज भासणार नाही यासाठी हायड्रोजनकडे जग वळत आहे. या तीन मोठ्या बदलांच्या आधारावर जगाचे तापमान वाढीला कारणीभूत असलेल्या उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ शकते, अशी आशा आहे. या तापमानवाढीमुळे जगाच्या कानाकोपऱ्यात नैसर्गिक संकटांचे विविध रुप पाहवयास मिळत आहे.

जगाला अत्यंत वेगाने अणि सर्वंकष रुपातून पुढे जाण्याची गरज आहे आणि तशी अपेक्षा बाळगणेही चुकीचे नाही. मात्र हरित जगाकडे नेणाऱ्या व्यापारतंत्राच्या मॉडेलचे काय करणार? असा प्रश्न विचारण्याचे कारण म्हणजे या स्रोतांचा उपयोग करणारे जुने मॉडेलच अनेक समस्यांना कारणीभूत आहे, यात सामाजिक आणि पर्यावरणीय दुष्परिणाम देखील जोडले गेले आहेत. आता खाण उत्खननाचे प्रकरण पाहू. कोळसा असो, पोलाद असो, कच्चे खनिज असो किंवा अल्युमिनिअम. ऊर्जा आणि उद्योगांच्या गरजांसाठी या कच्च्या मालांचे उत्खनन होत असल्याने पर्यावरणाची मोठी हानी झाली आहे. भारतातही त्याचे भयावह रुप दिसत आहे. अशा प्रकारची खनिज संपदा ही जंगल, वन्यजीवांचा अधिवास आणि आदिवासींच्या रहिवास क्षेत्राजवळच असतो. म्हणजेच हे स्रोत समृद्ध जमीन आणि गरीब लोकांच्या जीवनाशी संबंधित आहेत.

आपल्या अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक असणारा खनिजसाठा मिळवण्यासाठी आपल्याला जंगलतोड करावी

लागत आहे आणि स्थानिक समुदायांना अन्यत्र जावे लागत आहे. अशा प्रकारचे उत्खनन आणि महसूल मिळवून देणाऱ्या आर्थिक मॉडेलची नकारात्मक बाजू म्हणजे या ठिकाणच्या लोकांना स्रोतांचा लाभ मिळालाच असे नाही. हीच गोष्ट जगात वाईटरित्या राबविली जात असून त्यामुळे उद्योगातील वाढते उत्सर्जन सर्वांनाच विनाशकारी हवामान बदलाकडे नेत आहे. नव्या हरित अर्थव्यवस्थेतही जगाला खनिजांची गरज भासणार आहे. मग ते वेगवेगळ्या प्रकारचे का असेनात. लीथियम, निकेल, कॉपर, कोबाल्ट, ग्रेफाइट आणि हे सर्व खनिज दुर्गम भागात, घनदाट जंगलात आढळून येतात. खनिजासारखे मौल्यवान धातू सामान्य समाजरचनेपासून कोसो दूर असलेल्या वंचित लोकांच्या जमीनीवरच सापडतात. केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगात असेच चित्र आहे. न्यूयॉर्कमध्ये मुख्यालय असलेल्या एका बाजाराचे सल्लागार 'एमएससीआय'च्या एका अहवालानुसार, अमेरिकेत निकेलचा ९७ टक्के, तांब्याचा ८९ टक्के, लीथियमचा ७९ टक्के आणि कोबाल्टचा ६८ टक्के साठा हा केवळ ५५ किलोमीटर क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. हा भाग मूळ अमेरिकी वंशाच्या नागरिकांसाठी सुरक्षित आहे. मध्य अमेरिकेपासून आफ्रिका, आशियात असणाऱ्या संरक्षित भागाची अशीच स्थिती आहे.

एकपरीने हरित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याचा अर्थ म्हणजे अशा खनिज स्रोतांच्या गरजेत अनेक पटीने वाढ करणे आहे का? याउपरही आपली पृथ्वी आणि त्यावर राहणाऱ्या नागरिकांच्या वर्तनात काही फरक पडणार आहे का? संघर्ष तर अगोदरपासूनच आहे. उदा. अमेरिकेतील ॲरिझोना भागात दिग्गज कंपन्यांनी रियो टिंटो आणि व्हीएचपी बिलिटनच्या रिझोल्यूशन येथे तांबे उत्खनन केल्याने परिसरातील मूळ निवासी समुदाय संतप्त आहे. कारण हे उत्खनन त्यांच्या पवित्र जमीनीवर होत आहे. संपूर्ण जगात नव्या धातूंच्या आणि पर्यायांची शोधाशोध सुरू असताना तेथेही अशीच स्थिती आहे. या उद्योगात कोणतेही नवीन नियम आणि कायदे नाहीत. आपल्याकडे खनिज उत्खननाला पर्यावरण आणि सामाजिक रुपातून तर्कसंगत करताना बराच काळ घालविला. मात्र दुर्दैवाने त्यावर समाधानकारक तोडगा निघाला नाही. अनेक वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने आदिवासी समुदायाचा सहभाग असल्याशिवाय त्यांच्या जमीनीवर कोणतेही उत्खनन होणार नाही, असे बजावले होते. याचाच अर्थ आदिवासींना किमान या व्यवसायात बरोबरीचा वाटा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. मात्र त्यास नाकारण्यात आले. यानंतर उत्खननानंतर मिळणाऱ्या महसूलाचा वाटा हा स्थानिक समुदायाला देण्यात यावा, यासाठीही प्रयत्न केले गेले. मात्र ते देखील नाकारण्यात आले. अखेरचा प्रयत्न म्हणून उत्खननापासून मिळणाऱ्या महसुलाचा वाटा स्थानिक समुदायांना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

जिल्हा खनिज फाउंडेशन (डीएमएफ) स्थापन करताना त्याच्यापहिल्याच मसुद्यात स्थानिक समुदायांना व्यवसायात भागीदार करुन घेण्याचा मुद्दा होता. मात्र त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. नफ्यातील वाटा देणे किंवा खनिजकामाच्या विकासात लोकांना सहभागी करून घेण्याचा व्यापक विचार हा केवळ खनिजावर अतिरिक्त उपकर लागू करण्यापुरतीच मर्यादित राहिला. हा उपकर 'डीएमएफ'कडे जमा केला जात होता आणि सरकारकडून या निधीचा वापर स्थानिक लोकांसाठी करण्याऐवजी त्यांच्या मुळावर येणाऱ्या कामांना दिला आणि त्यालाच आपण विकास म्हणतो. पर्यावरण अणि जंगलातील कामासंबंधीच्या परवानग्याच्या बाबतीतही अशीच स्थिती आहे. याचा उद्देश स्थानिक समुदायांच्या परवानगीने विविध विकास कामे सुरू करण्याचा अधिकार देण्याचा होता. नवीन वन भूमीवर कोणताही प्रकल्प सुरू करताना त्यावर येणाऱ्या आक्षेपांना महत्त्व देण्यात आले होते. मात्र विकासाच्या नावावर हे संरक्षण देखील काढून घेतले जात आहे. पण त्याकडे सामाजिक रुपातून पाहिल्यास सर्वसमावेशक आणि संपूर्ण हरित भविष्य उभारणीत मदत मिळू शकते, हे लक्षात घेतले पाहिजे.

जुन्या अर्थव्यवस्थेत नेहमीच वादग्रस्त ठरणारा एक विषयअसतो आणि ती म्हणजे प्रकल्पाची जागा. प्रकल्पातील तप्त पोलाद, आग ओकणाऱ्या भट्ट्यांमुळे स्थानिक समुदायांना प्रदूषणाचा आणि त्यांच्या जीवनमानावर तसेच उदरनिर्वाहावर परिणाम होण्याची भीती वाटायची. आता पवन चक्की आणि सौर ऊर्जेबाबतही प्रश्न उपस्थित केला जात आहे. वास्तविक वन्यप्राण्यांचा अधिवास असणाऱ्या भागातच त्याची उभारणी केली जात आहे. यातही आता प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून नव्याने प्रस्थापित होणाऱ्या हरित अर्थव्यवस्थेत सरकार संघर्ष टाळणारे आणि तोडगा काढणारे नियम तयार करतील का?जेणेकरून या माध्यमातून स्थानिक समुदाय आणि पर्यावरणाचे संरक्षण केले जाईल. या बदलाकडे धावण्याचा अर्थ जुनेच किंवा त्यापेक्षा वाईट मार्ग अंगीकारणे आहे का?

जुन्या अर्थव्यवस्थेच्या काळात संपदा वृद्धीचा प्रत्यक्षपणे गरीबजनतेला काही फायदा झाला नाही. ज्या ठिकाणी कोळसा काढला जातो, ऊर्जा निर्मिती होते तेथेच आता अंधार आहे. नवीन अर्थव्यवस्थेत सर्वसमावेशक बदलाची हमी आहे का? असे घडले तरच ते शाश्वत राहू शकते. नाही झाले तर नव्या अर्थव्यवस्थेला नवीन म्हणणे योग्य ठरणार नाही आणि हरितही म्हणता येणार नाही.





# परदेशस्थांचा आर्थिक आधार

डॉ. अजित रानडे
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

***गेल्या काही वर्षांत भारतातून शिक्षण, रोजगार आदी कारणांमुळे परदेशात स्थलांतर होण्याचे प्रमाण वाढलेले असताना परदेशातून मायदेशी पैसे पाठविण्याच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झाली आहे. हे प्रमाण शेजारील देशांच्या तुलनेत कैकपटीने अधिक आहे. २०२२ मध्ये भारताला पैसे पाठविण्याच्या माध्यमातून १११ अब्ज डॉलरपेक्षा अधिक रक्कम मिळाली. ही रक्कम २०१० च्या तुलनेत दुपट आहे आणि त्यात वार्षिक सहा टक्क्यांपेक्षा अधिक दराने वाढ होत आहे. यातील मोठा वाटा आखाती देशातून येतो आणि तेथे भारतीय उत्पादन, ठोक, सुरक्षा, वाहतूक तसेच निम्न कुशल उद्योगात काम करतात. भारत जागतिक व्यापार संघटनेनुसार कामकाजासंबंधी विशेष परमिट व्यवस्था आणण्याबद्दल आग्रही आहे. या आधारावर नागरिकांना सुलभतेने प्रवास करता येईल आणि व्हिसाच्या वेळी अडचणी येणार नाहीत.***

---

गेल्या काही वर्षांत भारतातून शिक्षण, रोजगार आदी कारणांमुळे परदेशात स्थलांतर होण्याचे प्रमाण वाढलेले असताना परदेशातून मायदेशी पैसे पाठविण्याच्या प्रमाणातही लक्षणीय वाढ झाली आहे. हे प्रमाण शेजारील देशांच्या तुलनेत कैकपटीने अधिक आहे. परंतु स्थलांतरित होणारा बहुतांश वर्ग अकुशल आणि निम्न उत्पन्न गटातील आहे. त्याचवेळी भारतातून देशाबाहेर पैसा पाठविणाऱ्यांत श्रीमंतांची संख्या अधिक आहेत.

संयुक्त राष्ट्राच्या आंतराष्ट्रीय स्थलांतर संघटनेच्या जागतिक स्थलांतर अहवाल-२०२४ ने जारी केलेले आकडे संशोधकांना, धोरणकर्त्यांना एवढेच नाही तर माध्यमकर्मींना देखील उपयुक्त आहेत. जगभरात स्थलांतरितांच्या विरोधात भावना तीव्र होत असताना या आकडेवारीला विशेष महत्त्व आले आहे. स्थलांतर

हा मानवाचा हक्क आहे का? भारतीय घटनेने प्रत्येक नागरिकाला आपल्या देशातील कोणत्याही भागात ये जा करण्याचा अधिकार दिला आहे. मात्र सीमेपलिकडे ये-जा करण्याची स्थिती ही पूर्णपणे वेगळी आहे. अर्थात संयुक्त राष्ट्राने स्थलांतर करण्याच्या अधिकाराला मानवाधिकाराच्या रुपातून स्पष्टपणे निश्चित केलेले नाही. मात्र आपल्या देशासह कोणताही देश सोडण्याच्या अधिकाराला मुलभूत अधिकार मानला आहे. हे एक विरोधाभासात्मक चित्र आहे. परंतु असे नाही. मुस्कटदाबी होणार नाही, शोषण होणार नाही या हेतूने स्थलांतर करणाऱ्या नागरिकांना हा अधिकार दिला आहे. त्यामुळे आपण अन्य देशात स्थलांतर करू शकता. मात्र कोणत्याही देशात प्रवेशाचा अधिकार दिला जाईल, असे समजणे चुकीचे ठरेल. एखाद्या देशात आश्रय मागणे किंवा जबरदस्तीने मायदेशी न पाठविण्याबाबतच्या अधिकाराला संयुक्त राष्ट्राने मान्यता दिली आहे. ही व्यवस्था दडपशाही किंवा शोषणाचा धोका लक्षात घेऊन करण्यात आली आहे.

संयुक्त राष्ट्राच्या आकलनानुसार, २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांची संख्या २८.१२ कोटी होती आणि ती जागतिक लोकसंख्येच्या ३.६ टक्के आहे. यात संघर्ष, शोषण, हिंसाचार, राजकीय अस्थैर्य आदी कारणांमुळे पलायन करणाऱ्या नागरिकांबरोबरच आर्थिक आघाडीवर संधीच्या शोधात दुसऱ्या देशांत जाणाऱ्या स्थलांतर करणाऱ्यांचाही समावेश आहे. आर्थिक कारणांमुळे स्थलांतर हा नक्कीच मानवाधिकार नाही, परंतु एखादा नागरिक अर्थार्जनासाठी अन्य देशांत जात असेल तर तेव्हा त्याचे शोषण थांबविण्यासाठी आणि काही मुलभूत हक्काच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय करार आणि कायदे अस्तित्वात आहेत. आर्थिक कारणाने स्थलांतरित करणाऱ्या भारतीय नागरिकांची संख्या विक्रमी राहिली आहे आणि गेल्या तीन दशकांपासून ही मंडळी आपल्या मेहनतीची कमाई मायदेशात पाठवत आहेत. या कारणांमुळे फॉरेन रेमिटन्समध्ये भारत अन्य देशांच्या तुलनेत खूप पुढे आहे.

भारताला या परदेशस्थांच्या माध्यमातून २०२२ मध्ये १११ अब्ज डॉलरपेक्षा अधिक रक्कम मिळाली. ही रक्कम भारताच्या व्यापारी तुटीच्या जवळपास निम्मी आहे. हा पैसा मेक्सिको आणि चीनला परदेशस्थ नागरिकांकडून मिळणाऱ्या निधीपेक्षा दुप्पट आहे. भारताला मिळणारी ही कमाई २०१० च्या तुलनेत दुप्पट आहे आणि त्यात वार्षिक सहा टक्क्यांपेक्षा अधिक दराने वाढ होत असून हा आकडा सकल देशांतर्गत उत्पादनापेक्षा अधिक आहे. दुसरीकडे परदेशस्थ नागरिकांकडून होणाऱ्या चीनला होणाऱ्या कमाईत घट होत आहे; तर पाकिस्तान आणि बांगलादेशला मिळणारी रक्कम ही भारताच्या एक चर्तुथांश आहे. परदेशस्थ नागरिकांकडून भारताचा मिळणारा मोठा वाटा आखाती देशातून येतो आणि तेथे भारतीय उत्पादन, ठोक, सुरक्षा, वाहतूक तसेच निम्न कुशल उद्योगात काम करतात. ही मंडळी आपल्या कमाईचा चांगला वाटा मायदेशात पाठवतात आणि त्यामुळे कुटुंबाला चांगला आर्थिक हातभार लागतो. त्यांना सहा टक्क्यांपर्यंत शुल्क द्यावे लागते. पण त्यांच्यावर चलन विनिमय दराची जोखीमही राहते.

भारतातून बाहेर जाणाऱ्या पैशातही वाढ होत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अलिकडच्या आकडेवारीनुसार ही रक्कम २०२३-२४ मध्ये ३२ अब्ज डॉलरपेक्षा अधिक राहू शकते आणि तो आकडा गेल्या वर्षाच्या तुलनेत २५ टक्के अधिक आहे. भारतात येणारी बहुतांश रक्कम कामगारांकडून पाठविली जाते. परंतु भारतातून बाहेर जाणारा पैसा हा श्रीमंतांचा आहे. हा पैसा मुलांच्या शिक्षणासाठी, नातेवाईकांच्या राहणीमानाचा खर्च वहन करण्यासाठी, मालमत्ता खरेदीसाठी पाठविला जातो. या दोन प्रकारच्या नागरिकांच्या स्वरुपात बराच फरक आहे. बहुमुल्य परकीय चालन वाढविण्याच्या नावावर भारतातून बाहेर जाणारा पैसा रोखणे हा त्यावर उपाय नाही; मात्र आपल्याला पायाभूत गोष्टींची पडताळणी करावी लागेल. भारतात येणाऱ्या निधीची देखील चिंताजनक बाजू आहे. भारतात पैसे पाठविणाऱ्यांची निष्ठा अणि जबाबदारी सिद्ध होत असताना व्यापारी तूट आणि परकी चलन विनिमय दरातील चढउताराचा सामना करण्यास मदत मिळते. त्यामुळे भारतातून बहुतांशपणे श्रमाची निर्यात होत आहे. यातही चिंताजनक बाब म्हणजे हे श्रम तुलनेने कमी उत्पादन क्षेत्रातील आहे.

कामगारांना भारतात रोजगार मिळत नाही का? त्यामुळे अवलंबित्वात वाढ होत आहे का? कधीकाळी केरळच्या एकुण उत्पन्नाचा २५ टक्के वाटा हा बाहेरून येत होता. परंतु आता तो २० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. त्यामुळे केरळ राज्य आता प्रती व्यक्तीच्या खर्चाच्या बाबतीत श्रीमंत राज्यांच्या श्रेणीत आले आहे. परंतु तेथे कामगारांच्या टंचाईची समस्या गंभीर झाली आहे आणि त्याची भरपाई करण्यासाठी बिहार, झारखंड, ओडिशा यासारख्या राज्यांतून कामगारांना आणावे लागत आहे. बाहेरून येणाऱ्या पैशांनी केरळच्या मालमत्तेत मोठी वाढ नोंदली जात आहे. यानुसार राज्य किंवा देशाच्या पातळीवर बाहेरून येणाऱ्या पैशाचा स्थानिक पातळीवर संमिश्र प्रभाव आहे. हा पैसा उत्पादन, गुंतवणूक आणि उच्च तंत्रज्ञानाच्या उद्योगाऐवजी केवळ रिअल इस्टेटमध्ये गेला तर पुढे त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्याची आणखी एक बाजू जेंडरची देखील आहे. दोन तृतियांपेक्षा अधिक प्रवासी पुरुष आहेत आणि महिला सामाजिक व्यवस्थेनुसार मुलांचा आणि ज्येष्ठांचा सांभाळ करण्यासाठी भारतातच राहत आहेत. ही स्थिती श्रीलंका आणि फिलिपिन्समध्ये नाही.

भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. याठिकाणी उच्च प्रकारचा रोजगाराचा अभाव आहे आणि प्रती व्यक्ती उत्पन्न देखील कमी आहे. अशावेळी कमाईसाठी देश सोडून जाणे स्वाभाविक आहे. देशार्तंगत पातळीवर देखील लोकसंख्येचा एक तृतियांश भाग हा स्थलांतरित नागरिकांचा आहे. ते रोजगार आणि जीवनमान उंचावण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. बहुतांश स्थलांतर करणारे नागरिक हंगामी अणि गरजू असतात आणि अशी स्थिती अनेक राज्यार्तगत पाहवयास मिळते. भारताचे आंतराष्ट्रीय स्थलांतर हा पूर्णपणे वेगळा प्रकार आहे. प्रामुख्याने स्थलांतर करणाऱ्या नागरिकांचा वर्ग कामगार असेल तर जोखीम, शोषण, भेदभाव आदींचा धोका राहतो. यासंदर्भात दुतावास आणि उच्चायुक्तालयाने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. भारत जागतिक व्यापार संघटनेनुसार कामकाजासंबंधी विशेष परमिट व्यवस्था आणण्याबद्दल आग्रही आहे. या आधारावर नागरिकांना सुलभतेने प्रवास करता येईल आणि व्हिसाच्या वेळी अडचणी येणार नाहीत. आजघडीला स्थलांतर करणाऱ्या नागरिकांविरुद्धचा रोष दिसत असताना आर्थिक कारणाने स्थलांतर करणाऱ्यांसाठी आणि सेवा प्रदान करणाऱ्यांसाठी सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देण्यास वेळ लागू शकतो. तूर्त आपण परदेशातून येणाऱ्या भरभक्कम कमाईने आनंदी होऊ शकतो.

## ‘मॅक’ची वार्षिक सभासद वर्गणी मिळणे बाबत

महोदय,

‘मॅक’च्या सभासद बंधू-भगिनींना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांची **वार्षिक सभासद वर्गणी** संस्थेकडे जमा करावयाची राहिलेली आहे अशा सभासदांनी **लवकरात-लवकर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले** या नावाने चेक काढून संस्थेमध्ये जमा करून संस्थेस सहकार्य करावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

| **श्री. सुरेश क्षीरसागर** | **विठ्ठल पाटील** | **श्री. मोहन कुशिरे** | **श्री. हरिश्चंद्र धोत्रे** |
|---|---|---|---|
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# 365 DAYS ROHITRA



**CONNECT FOR QUALITY AND RELIABILITY!**



BIS 1180 approved transformers.
Rating up to 2500 kVA / 11 kV, 22kV, 33kV
and extended capacity up to 10 MVA.

■ Mineral Oil Filled Distribution Transformers ■ Ester Oil Filled Distribution Transformers ■ Isolation Transformers ■ Arc / Induction Furnace Transformers ■ Multi-Winding Transformers ■ Solar / Windmill applications Transformers ■ Corrugated Tank Transformers ■ Hermetically Sealed Maintenance-free Transformers ■ Transformers with On Load Tap Changer (OLTC)

IS 1180 : Part 1 · NABCB · ISO 9001:2015 · ICS · BIS 1180

Office: Pune, Maharashtra, India. **T. +91 20 48618683, M. +91 7219617700**
Works : Sanaswadi, Dist. Pune, Maharashtra, India. **M. +91 7219131053**

ROHITRA
INDIA PRIVATE LIMITED
*Power to you...!*

**www.rohitraindia.com**
**info@rohitraindia.com**






BAKERS PRIDE ®
KONARK
OVENS & BAKERY MACHINES

**Manufactures of
Bakery Ovens & Machines,
Industrial Furnace, Ovens
& Heat Treatment Machines**

H/O & Factory - Plot No. H-15 , 5 Star M.I.D.C , Kagal, Kolhapur- 416 236
www.konarkbakerymachines.com


**MICROTECH**

*Your Trusted Partner*

## MANUFACTURING OF SERVO STABILIZER
## AIR COOLED,OIL COOLED AND STATIC. 1PHASE AND 3 PHASE



## CONTROL PANELS



**AUTHORISED CHANNEL PARTNERS**

DELTA
CNC Solutions & Industrial Automation Product

INOVANCE
Automation Product

invt
Automation Product


## MANUFACTURING ROUGHING CNC LATHE MACHINE & SLANT BED CNC LATHE MACHINE



**SOLUTION FOR AUTOMATION IN MACHINE TOOL**

Retrofitting and Resale of USED CNC Machines,
System Integrator for DELTA and INOVANCE.


Unit -2



**MANUFACTURING DIVISION FOR ALL TYPES OF**

Electrical Control Panels, Water Solution Pump Panel,
Industrial Servo Stabilizer And Isolation Transformers.

Unit -1



Ph.: 0231 2305251
Cell : 93733 86677
93733 86622
www.microtech-automation.com

Unit -1 A-30, Kagal Hatkanangale 5 Star MIDC, Kolhapur, 416216.
Unit -2 Opp. Mayur Petrol Pump, Gokul Shirgaon MIDC, Kolhapur, 416216.
Branch Office - Plot No. Laxmi Building ,Opp. Manickbag ,Khanapur Road ,Udyambag , Belgaum -590008







MONARK
DUCTILE IRON CASTING PVT. LTD.
C 1/6, Five star MIDC Kagal, Kolhapur- 416236
Email ID : monarkductile@gmail.com
Call: 9975241896, 9225839991, 9011484008

# Advik Engineers

Transforming Ideas into Reality.



Cold Box Core Shooter Universal Parting Line



Cold Box Core Shooter Vertical Parting Line



Shell Core Shooter Vertical Parting Line



Cold Box Core Shooter Horizontal Parting Line

- Cold Box Core Shooters
- Shell Core Shooter
- Dump Bok Type Shell Moulding Machine
- Sand Conveying Systems
- Auto Sand Mixer With Auto Dosing (Cold Box)
- All Type Of Fabrication Works

Address : D-18 Kagal-Hatkanangale, Five Star MIDC Kagal.
Mob.: +91 8208232522 +91 9130592592

E-mail : info@advikengineers.com
Website : www.advikengineers.com

## Pre Engineered Buildings (PEB) Applications

| | | |
|---|---|---|
| Industrial Sheds | Cold Stores | Office Cabins |
| Warehouses | Godown | Car Parking |
| Workshops | Showrooms | Farm House |
| Factories | Exhibition Hall | Project Office Cabins |

## Proud to be associated with

Presently M and K Group is extending manufacturing support to following leading global companies for their international projects in Middle East and Europe

Thermax ThyssenKruup L&T Infra NPCIL

## Why Choose Us?

### State of the Art Manufacturing :

The factory is spread across 8 acres land with the annual production capacity of 60,000 MT. The plant is quintessentially well equipped with high precision CNC machines to fabricate and supply quality steel buildings

### Skilled Manpower :

Currently our team comprise of 250 certified, highly skilled and experienced professionals. We provide handsome opportunities to our team to showcase their talent and upscale them regularly.

### Expertise in Designing and Detailing :

Manufacturing of pre-engineered buildings requires creative approach and high precision. Our design and engineering team uses latest software for all PEB designs

### In time Project Completion :

We ensure that we keep our commitments. Every project is completed as per customers' timelines. We are proud to state that till date we have zero complaints w.r.t timelines

## Our Happy Customers

www.mandkpeb.in

M and K Building Systems Pvt. Ltd.
"Sustainable Steel Building Solutions"

9975 977994 mandkpebdesigns@gmail.com
A 85,Kagal-Hatkanangale Five Star MIDC Kolhapur (HAH) 416216

www.mandkpeb.in

M and K Building Systems Pvt. Ltd.

"Sustainable Steel Building Solutions"

# Pre-Engineered Buildings (PEB) Manufacturer


**Expandable,**
**Cost Effective,**
**Flexible,**
**Durable,**
**Energy Efficient**
**World Class Architectural Designs**

Projects Executed By Us



D-Mart, Nimshirgaon

Micrometal Foundry



Pioneer



Classic Gipsm



Tushar Industries



| 18+ | 1140+ | 100% | 3+ States 11+ Districts |
|---|---|---|---|
| Years of Experience | Projects Completed | Repeat Customers | Our Presence |

## M and K Advantage

"We are one of the leading PEB Manufacturers & Erectors in South Western Maharashtra and Uttar Karnataka."

"We also assist customers for getting, approval of Industrial Corporation / town planning, government subsidy schemes and bank finance"

## Why select Pre-Engineered Buildings (PEB)?

- 100% Off-Site Factory Production
- Low Maintenance
- Quick Assembly On-Site
- Expandable
- Minimized Site Disturbance
- Flexible and Versatile
- Cost Effective
- Energy Efficient

**Go Green with Pre Engineered Buildings. They are Easy to Relocate and Recycle**

ISO 9001:2015 TM

LOAD LIFT™

BEST QUALITY at LOWEST OFFER IS GUARANTEE

# SIMRAN TECHNOLOGY

Vikrant Kudale

+91 9845407235




OFFICE

Office : 2009/1A,
1st Floor Bilgi Jewellers,
Ganapat Galli, Belgaum

FACTORY

Work : Plot No. B13,
IT Park, KSSIDC Industrial
Area, Desur, Belgaum

W: www.simrantechnology.com E: simrankudale@gmail.com




BSUK
Since 1987
Kolhapur | Mumbai | Goa

MAKE IN INDIA
Business Service Unit of Kolhapur

SafeSeal®
Simply Packaging

**SAFESEAL**
**MACHINES PVT. LTD.**

## आमच्या असंख्य ग्राहकांसाठीचं

## ऑटो पॅकेजिंग व बॅच कोडींग

## अभ्यासपूर्वक अद्यावत मशिनची मालिका.. कोल्हापूरातून..!

**मुख्य कार्यालय:** जी 135. एम.आय.डी.सी. टेलिफोन ऑफिस जवळ, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर- 416234

9371672126, 9321202112, 9371100659 (0231) 2672126 R
**शाखा नं.1 :** मुंबई 9322599203 (022) 22071783
**शाखा नं.2 :** गोवा 9371172126 (0832) 2252290

**फॅक्टरी:** D-56/२, कागल-हातकणंगले फाईव्ह स्टार, एम.आय.डी.सी., कोल्हापूर - 416 236

www.bsuk.in • bsuk99@yahoo.com • www.safeseal.in



**Balancing between running a smooth business and at the same time protecting it from unforseen factors is like sailing in a storm..**

We at Midas Investment Consultancy, understand this better as an investment partner... With our rich experience of 25 years, let us help you sail through these storms by securing your business assets and liabilities..


MIDAS
INVESTMENT CONSULTANCY

**Mrs. Savita Sagare**
**Cell: +91 98500 99477**
Shop No. 10, HR3 Building, Star Ashiayana, Near Kolhapur Public School, Morewadi Naka, Kolhapur. email: savitasagare@ymail.com

**OUR EXCLUSIVE INDUSTRIAL SERVICES**

- Factory Insurance.
- Raw, Scrap & Finished Material and Machinery Insurance.
- Labour Insurance.
- Industrialist Income protection plans.
- Life & Health Insurance.
- Group Gratuity & Provident Fund Schemes.
- Import & Export Insurance.

LIC
The New India Assurance Co. Ltd




MakNet®

## One Step Ahead, Always... In Quality & Service



- Hydraulic Elevators
- Passenger Elevators
- Hospital Elevators
- Home Elevators
- Car Elevators
- MRL Elevators
- Gearless Elevators
- Bungalow Elevators
- Goods Elevators
- Service Elevators
- Capsule Elevators
- Escalators

## Excellent Product Range Supported By Excellent Service




MakNet®
INDUSTRIES PVT. LTD.

**Corporate office :**
3rd Fl, Bhaskar Plaza, Shahupuri, Kolhapur, India - 416 001
+91 231 2666221/24, 9326269314
mak1@maknet.co.in, mak2@maknet.co.in

Belagavi: +91 9326269314 I Vijapur: +91 9326269309
mak6@maknet.co.in
**www.maknet.co.in**